१०

# कथासरित्सागरातील अनमोल मोती

गो.काटकर

BVBK-0402983

बा. वा. -
२९८३
३१।३।८४

# कथासरित्सागरातील अनमोल मोती

## भाग दहावा

निवेदक

**मा. गो. काटकर**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. क्र. २९८३ दिनांक ३१।३।८४
विषय बा. वा. क्र. ........

कौस्तुभ प्रकाशन
नागपूर २२

BVBK-0402983

**प्रकाशक :**
शैलेश देशपांडे,
कौस्तुभ प्रकाशन,
२९/अ, नवनिर्माण सोसायटी,
राणा प्रतापनगर,
**नागपूर २२**

**मुद्रक :**
प्रभाकर धाक्रस,
सूर्य ऑफसेट,
रामदास पेठ,
**नागपूर १०**

© **सर्वाधिकार :**
मा. गो. काटकर
सोलापूर

**नवीन आवृत्ती :**
१५ ऑगस्ट १९९३

**मूल्य :**
**वीस रुपये**

## निवेदन

*कुमार मित्रांनो!*
*पंडित सोमदेव हा विलक्षण प्रतिभाशाली कवी होता. त्याने बृहत्कथेतून कथा-सरित्सागरात घेतलेल्या साडेतीनशेहून जास्त छोट्या मोठ्या कथांची मोठी बहारदार व चित्ताकर्षक गुंफण केलेली आहे. मानवी स्वभावाची विविधता दाखविणाऱ्या या नाना प्रकारच्या निवडक कथांचे संकलन या संग्रहात केले आहे. या महान कथासागरातील मनोरंजक व उद्‌बोधक कथा तुम्हास नक्कीच आवडतील असा विश्वास वाटतो.*

**- मा. गो. काटकर**

## कथाक्रम

१) धैर्यशाली मृगांकदत्त — ३
२) चतुर ससा — ३२
३) स्वामिनिष्ठेचे फळ — ३५

म. ग्रं. सं. ठाणे, ... शाखा.
बाल ... विभाग.
ग्रा. क्र. २९८३ ... ३७।३।९४
विषय ...

# धैर्यशाली मृगांकदत्त

अयोध्या नावाच्या नगरीत फार पूर्वी अमरदत्त नावाचा राजा राज्य करीत होता. तो देखणा, सद्‌गुणी व प्रजाहित तत्पर होता. त्याच्या राणीचे नाव इंद्रप्रभा असे होते. तिच्या ठायी अमरदत्ताला मृगांकदत्त या नावाचा मुलगा झाला. यथावकाश तो वाढत जाऊन नाना विद्या व कला यात पारंगत झाला. त्या सद्‌गुणी राजपुत्राला प्रचंड शक्ती, स्थूल बाहू, विक्रमकेसरी, दृढवान्, मेघबल, भीमपराक्रम, विमलबुद्धी, व्याघ्रसेन, गुणाकर आणि विचित्रकथ असे दहा सचिव होते. ते सर्व चांगल्या कुळात उत्पन्न झालेले, बुद्धिमान, तरुण, प्रतापी, व आपल्या धन्याचे सदैव हित चिंतणारे होते. मृगांकदत्त वयाने मोठा झाला होता. पण अद्याप त्याला योग्य अशी भार्या मिळाली नव्हती.

एके दिवशी मृगांकदत्ताचा भीमपराक्रम नावाचा मंत्री त्याला म्हणाला, 'महाराज, काल रात्री एक अद्‌भुत घटना माझ्या अनुभवास आली. नेहमीप्रमाणे मी आपल्या वाड्याच्या माडीवर झोपलो होतो. एकाएकी मला जाग आली. तेव्हा एक भयंकर सिंह मला दिसला. तेव्हा मी चटकन हातात तलवार घेऊन उठलो. त्याबरोबर तो सिंह पळत सुटला. मी त्याचा पाठलाग करू लागलो. पण तो नदीच्या पलीकडे गेला. आणि वळून माझ्याकडे बघत आपला जबडा पसरून व जीभ बाहेर काढून उभा राहिला. तेव्हा मी रागाने नदीपार होऊन त्याच्यापाशी गेलो. आणि माझ्या हातातील तलवारीने त्याची जीभ कापून टाकली. तो काय आश्चर्य! त्या सिंहाच्या जागी मला एक अक्राळविक्राळ व धिप्पाड पुरुष दिसला. तेव्हा मोठ्या आश्चर्याने मी त्याला विचारले, 'तू कोण ?'

असा माझा प्रश्न ऐकताच तो म्हणाला, 'हे वीर पुरुषा, मी वेताळ आहे. तुझं धैर्य पाहून मी संतुष्ट झालो आहे.' 'तू माझ्यावर संतुष्ट झाला आहेस,'



मी म्हणालो, 'तर मी विचारतो ती गोष्ट तू मला सांग. माझे प्रभू मृगांकदत्त यांची भार्या कोण होणार? व ती कुठं आहे?' तेव्हा तो वेताळ म्हणाला, 'उज्जयिनीच्या कर्मसेन राजाची कन्या शशांकवती तुझ्या प्रभूची भार्या होईल. ती प्राप्त झाली म्हणजे तुझा प्रभू पृथ्वीपती होईल.' एवढे बोलून तो वेताळ अदृश्य झाला. आणि मी आपल्या वाड्याकडे परत आलो.'

असे भीमपराक्रमाचे शब्द ऐकून मृगांकदत्ताला फार आनंद झाला. त्याने आपल्या इतर मंत्र्यांना बोलावून घेतले. आणि ते वृत्त त्यांना सांगून तो पुढे म्हणाला, 'मलाही काल असेच स्वप्न पडले. त्या स्वप्नात माझ्या काय नजरेस पडले, ते आता ऐका. आपण सर्वजण एका अरण्यातून प्रवास करीत आहोत. तेव्हा तहान लागल्यामुळे पाणी जवळपास कोठे आहे का याचा शोध घेऊ लागलो. बराच वेळ शोध केल्यानंतर आपणांस एक सरोवर दिसले. तेव्हा मोठ्या आनंदाने आपण जलप्राशनार्थ त्याच्यापाशी गेलो. तोच त्या सरोवराच्या काठी एकाएकी प्रगट झालेल्या पाच शस्त्रधारी पुरुषांनी आपणास पाणी

पिण्यास अटकाव केला. तेव्हा त्यांना ठार मारून आपण पाणी पिण्यास जात आहोत, तोच ते सरोवर व ते मृत पाच पुरुष अकस्मात अदृश्य झाले. तेवढ्यात दिव्य अशा पांढऱ्या शुभ्र बैलावर बसलेल्या महेश्वराला आपण पाहिले. सर्वांनी त्याला भक्तिभावाने वंदन केले. तेव्हा महेश्वराच्या उजव्या नेत्रातून एक अश्रुबिंदू जमिनीवर पडला. त्याबरोबर तिथे एका फार मोठा समुद्र निर्माण झाला. त्या समुद्रात मला एक पांढऱ्या शुभ्र मोत्यांची माळ सापडली. मी ती गळ्यात घातली. आणि तो मोठा समुद्र कमळाच्या पानाच्या द्रोणाने पिऊन टाकला. आणि मी झोपेतून जागा झालो.'

असे मृगांकदत्ताने सांगितलेल्या अद्‌भुत स्वप्नाचे वर्णन ऐकून त्याच्या मंत्र्यांना आनंद वाटला. त्या स्वप्नाचा अर्थ सांगताना विमलबुद्धी नावाचा मंत्री मृगांकदत्ताला म्हणाला, 'महाराज, आपणास साक्षात महेश्वराचे दर्शन झाले. तेव्हा त्याची तुमच्यावर कृपा आहे. मोत्यांची माळ सापडून आपण फार मोठा समुद्र पिऊन टाकलात त्यावरून आपणास शशांकवती प्राप्त होऊन आपण पृथ्वीपती होणार. आता अरण्यातून प्रवास करणे, तहान लागणे, सरोवर दिसणे, तेथे अकस्मात पाच पुरुष येणे इत्यादी गोष्टी आपणास होणारा त्रास दाखवितात.'

असा विमलबुद्धीने सांगितलेला आपल्या स्वप्नाचा अर्थ मृगांकदत्ताने लक्षपूर्वक ऐकला. नंतर तो आपल्या सर्व मंत्र्यांना म्हणाला, "माझ्या स्वप्नाप्रमाणे तसेच वेताळाने भीमपराक्रमाला जे सांगितले, तसे जरी प्रत्यक्षात घडून येणार असले तरी ज्याला आपल्या सैन्यबळाचा व अजिंक्य दुर्गाचा मोठा अभिमान आहे अशा राजा कर्मसेनाची ही कन्या शशांकवती आपल्या बुद्धिसामर्थ्यानेच प्राप्त करून घेतली पाहिजे. सर्व कार्याच्या सिद्धीचे मुख्य साधन, बुद्धीचे बळ हेच आहे." "ते तर खरंच आहे," विचित्रकथ मंत्री म्हणाला, "पण आपणास स्वप्नात झालेल्या महेश्वराच्या कृपेने इच्छिलेली गोष्ट निर्विघ्नपणे साध्य होईल. देवतांचा कृपाप्रसाद कधीही निष्फळ होत नाही!"

नंतर आपल्या मंत्र्यांचा विचार घेऊन, कर्मसेन राजाच्या शशांकवती

कन्येस प्राप्त करून घेण्यासाठी मृगांकदत्ताने उज्जयिनीस जाण्याचा बेत केला. त्यासाठी महाव्रत्याचा वेष धारण करून नगराबाहेर पडावे असे त्याने ठरविले. त्याप्रमाणे त्या वेषाला साजेसे साहित्य गुप्तपणे गोळा करून ठेवण्यात त्याने भीमपराक्रमाला सांगितले. थोड्याच दिवसात भीमपराक्रमाने ते साहित्य आपल्या घरी आणून ठेवले. ती बातमी आपल्या हेरांकडून महामंत्र्याला समजली. पुढे एके दिवशी भीमपराक्रमाच्या माडीवर बसलेल्या मृगांकदत्ताने विडा खाऊन खाली पिंक टाकली. दैवयोगाने ती त्याच वेळी माडीखालून जाणाऱ्या महामंत्र्याच्या अंगावर पडली. ती पिंक कोणी टाकली याचा तपास करता ते मृगांकदत्ताचे कृत्य आहे असे त्याला कळले. तेव्हा आपला अपमान झाला असे वाटून महामंत्र्याला मृगांकदत्ताचा फार राग आला.

दुसऱ्या दिवशी दैवयोगाने अमरदत्त राजाच्या पोटात एकाएकी दुखू लागले. त्यामुळे राजा फार व्याकुळ झाला. तेव्हा मृगांकदत्ताने केलेल्या अपमानाचा बदला घेण्यास ही योग्य संधी आहे, असे जाणून महामंत्री राजाला म्हणाला, 'महाराज, आपल्या मृगांकदत्त पुत्राने मंत्रतंत्रादि कर्म करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आपणास पोटदुखीची पीडा होत असावी. हे वृत्त मला हेरांनी सांगितले आहे. तेव्हा ते सत्यच आहे. म्हणून मृगांकदत्ताला आपल्या राज्यातून हद्दपार करा. म्हणजे आपली प्रकृती बरी होईल.'

असे महामंत्र्याचे शब्द ऐकून अमरदत्ताला फार राग आला. त्याने ताबडतोब आपल्या सेनापतीला तपासासाठी भीमपराक्रमाच्या घराकडे पाठविले. तेव्हा त्याला तिथे मंत्रतंत्रादि विधीचे साहित्य आढळले. ते त्याने राजवाड्यात नेऊन राजापुढे ठेवले. ते पाहताच राजा संतापाने लाल होऊन म्हणाला, 'राज्यपदाच्या लोभानेच मृगांकदत्त हे कृत्य करीत आहे. तेव्हा तो राजद्रोही आहे. म्हणून त्याला त्याच्या मंत्र्यासह आताच्या आता नगराबाहेर हाकलून द्या!' अशी त्या अविचारी राजाने आपल्या सेनापतीला आज्ञा केली.

त्याप्रमाणे राजपुत्राकडे जाऊन सेनापतीनी त्याला राजाज्ञा सांगितली. तेव्हा मृगांकदत्ताने गणपतीचे पूजन केले आणि मनाने आपल्या मातापित्यास

वंदन करून तो आपल्या मंत्र्यांसह अयोध्या नगरीतून बाहेर पडला. नंतर तो आपल्या दहा मंत्र्यांना म्हणाला, ‘आता आपण इथून शक्तिरक्षित या नावाच्या एका भिल्ल राजाकडे जाऊ. तो माझा गुरुबंधु आहे. त्याच्या पित्याच्या निधनानंतर माझ्या पित्याने शक्तिरक्षिताच्या राज्यलोभी आप्तांचा बंदोबस्त करून त्याला राज्यावर बसविले आहे. तेव्हा प्रथम त्याच्याकडे जाऊन आपल्या इच्छित कार्यास त्यांची संमती घेऊ आणि नंतर उज्जयिनीकडे मार्गक्रमण करू.''

मृगांकदत्ताच्या या विचाराला सर्व मंत्र्यांनी मान्यता दिली. त्याप्रमाणे ते वाटचाल करीत पुढे निघाले. सूर्यास्ताच्या सुमारास मृगांकदत्त आपल्या मंत्र्यांसह एका मोठ्या अरण्यात येऊन पोहोचला. त्या अरण्यातले वृक्ष वठलेले व दग्ध झालेले होते. तिथे पाणी कोठेच नव्हते. इकडे तिकडे त्याचा खूप शोध केल्यानंतर एक सरोवर त्यांच्या दृष्टीस पडले. त्या सरोवराच्या काठी एकच वठलेले झाड उभे होते. अशा त्या सरोवरापाशी जाऊन सर्वांनी संध्यावंदनादि करून पाणी प्राशन केले. सर्व दिवस वाटचाल झाल्यामुळे थकलेला मृगांकदत्त, मंत्र्यांसह त्या वठलेल्या वृक्षाखाली झोपला. थोड्याच वेळात त्या सर्वांना गाढ झोप लागली.

मध्यरात्रीच्या सुमारास मृगांकदत्ताला एकाएकी जाग आली. तेव्हा तो डोळे चोळीतच आश्चर्याने ताडकन् उठून बसला. सर्वत्र पडलेल्या टिपूर चांदण्यात तो वठलेला वृक्ष पानांनी, फुलांनी व फळांनी बहरलेला आहे, असे त्याच्या नजरेस पडले. दुसऱ्या क्षणी त्या वृक्षाची पिकलेली रसदार फळे टपटप् खाली पडू लागली. तेव्हा मृगांकदत्ताने चटकन आपल्या मित्रांना जागे करून तो अद्भुत चमत्कार दाखविला. मग भुकलेल्या त्या सर्वांनी ती मधुर रसदार फळे खाण्यास सुरुवात केली. तेव्हा आणखी एक आश्चर्याची गोष्ट घडून आली. फळे खाणाऱ्या त्या सर्वांच्या समक्ष त्या वृक्षाचे एका मुनिपुत्रात रूपांतर झाले.

तेव्हा आश्चर्याने थक्क झालेल्या मृगांकदत्ताने त्या मुनिपुत्राला

विचारले, 'तू कोण ? इथं एकाएकी कसा प्रगट झालास ?' तेव्हा तो मुनिपुत्र म्हणाला, "महाभाग, अयोध्येतील दमधी या नावाच्या एका विद्वान ब्राह्मणाचा मी मुलगा. माझं नाव श्रुतधी. दुष्काळात माझी आई अन्नाच्या अभावी कालवश झाली. तेव्हा माझा पिता माझ्यासह भटकत या स्थळी आला. त्यावेळी त्याला कुणीतरी पाच फळे दिली. त्या फळांपैकी त्यानं तीन माझ्या हाती दिली. व दोन स्वतःसाठी ठेवली. आम्ही दोघेही भुकेने व्याकुळ झालेलो होतो. माझा पिता स्नानार्थ सरोवराकडे गेला असता मी माझी व त्याची अशी पाचही फळे खाऊन टाकली. आणि झोपेचे सोंग घेतले. स्नान करून आलेल्या माझ्या पित्याला ठेवल्या जागी आपली फळे दिसली नाहीत. तेव्हा ती मी खाऊन टाकली, असे त्याने ओळखले आणि रागाने मला शाप दिला, 'वठलेले झाड होऊन तू या सरोवराकाठी राहा. चांदण्या रात्री तुला पानांचा, फुलांचा व फळांचा बहर येईल. तू जेव्हा आपल्या फळांनी इथं आलेल्या अतिथींची भूक तृप्त करशील तेव्हा तू शापमुक्त होशील !'

त्या शापाप्रमाणे मी आजपावेतो इथं वठलेला वृक्ष होऊन राहिलो होतो. आज मी माझी फळे देऊन तुमची भूक भागविली. त्यामुळे आता मी शापमुक्त झालो आहे." अशी आपली हकीकत सांगून श्रुतधीने मृगांकदत्ताला विचारले, 'तुम्ही कोण ? इथं कसे आलात ?' तेव्हा मृगांकदत्ताने आपली सर्व हकीकत त्याला सांगितली. ती ऐकल्यानंतर श्रुतधी मृगांकदत्ताला म्हणाला, 'आता मला कोणी नातलग उरला नसल्यामुळे यापुढे मला आपण आपला अनुयायी म्हणून आपल्याबरोबर न्यावे अशी माझी विनंती आहे.' तेव्हा मृगांकदत्ताने आपल्या मंत्र्यांना विचारून श्रुतधीला आपल्याबरोबर येण्यास संमती दिली. नंतर उरलेली रात्र तिथेच काढून सकाळी तो सर्वांसह पुढील प्रवासाला निघाला.

पुढे त्याने करिमंडित या नावाच्या एका वनात प्रवेश केला. तिथे त्याला केसाळ व विद्रूप असे पाच पुरुष दिसले. त्यांना पाहून मृगांकदत्ताला मोठे आश्चर्य वाटले. तेवढ्यात पाचही पुरुष मृगांकदत्ताजवळ आले. आणि

त्याला वंदन करून म्हणाले, 'आम्ही काशी निवासी, गायींचे पालनपोषण करून उदरनिर्वाह करणारे ब्राह्मण आहोत. आमच्या देशात दुष्काळ पडल्यामुळे आम्ही आपल्या गायीसह या गवताळ वनात आलो. येथील विहिरीचे पाणी आम्हाला व आमच्या गायींना संजीवन देणारे ठरले. असे ते दिव्य पाणी गायी पितात. आणि त्या गायींच्या दुधावर आम्ही जगतो. आम्ही या जनशून्य वनात पाचशे वर्षे आहोत. आम्ही विद्रूप का दिसतो याचे ते कारण आहे. आज आपण अतिथी म्हणून येथे आला आहात. तेव्हा कृपाकरून आमच्या आश्रमाकडे चला.' अशी त्या ब्राह्मणांची विनंती मान्य करून मृगांकदत्त आपल्या अनुयायांसह त्यांच्याबरोबर आश्रमाकडे गेला. तेथे दुग्धाहार व विसावा घेऊन त्याने तो दिवस तिथेच घालविला.

दुसऱ्या दिवशी मृगांकदत्त आपले मंत्री व श्रुतधी यांच्यासह पुन्हा शक्तिरक्षिताकडे गेला. आणि त्यास योग्य समयी आपणास सहाय्य करण्यास सांगून एका शुभ दिवशी त्याने उज्जयिनीचा मार्ग धरला. बराच वेळ प्रवास केल्यानंतर मृगांकदत्ताने एका अरण्यात प्रवेश केला. तेथे एका झाडाखाली त्याला एक जटाधारी तपस्वी दिसला. तेव्हा आश्चर्य वाटून मृगांकदत्त आपल्या अनुयायांसह त्या तपस्व्याजवळ गेला. आणि त्याने त्याला वंदन करून विचारले, 'भगवान, आपण इथं असं एकटेच का बसलात ? आपला आश्रम तर इथं जवळपास कुठं दिसत नाही!' असा मृगांकदत्ताचा प्रश्न ऐकून तो तपस्वी म्हणाला, 'मी शुद्धकीर्ति गुरूचा शिष्य आहे. बहुतेक सर्व मंत्रांची सिद्धी मी प्राप्त करून घेतली आहे. एकदा एक सुलक्षणी क्षत्रिय कुमार मला भेटला. त्याने मला सांगितले की इथून उत्तर दिशेला असलेल्या विंध्यारण्यात एक शिंशपा वृक्ष आहे. त्याच्याखाली धुळीने आच्छादित असे एक सरोवर आहे. त्या सरोवरात पारावत नावाचा एक महाबलाढ्य नाग राहतो. त्याने देवाकडून वैदूर्यकांती नावाचे एक खड्ग प्राप्त करून घेतले आहे. त्या खड्गाचा विशेष असा की ते ज्याच्या हाती येईल तो सिद्धांचा राजा होईल, व सर्वत्र विजयी होईल. पण ज्या पुरुषाला मदत करणारे शूर वीर आहेत, त्यांनाच त्या खड्गाची प्राप्ती होईल.' एवढे सांगून तो क्षत्रियकुमार निघून गेला. ते खड्ग आपणास

प्राप्त व्हावे या इच्छेने एखाद्या महावीराचे साहाय्य मिळविण्यासाठी मी सर्वत्र भटकलो. पण तसा कोणीच न मिळाल्यामुळे मी अतिशय निराश होऊन आता इथं देहविसर्जनासाठी आलो आहे.'

असे त्या तपस्व्याचे अद्भुत वृत्त ऐकून मृगांकदत्त त्याला म्हणाला, 'मी माझ्या मंत्र्यांसह तुझा साहाय्यकर्ता होतो. तू आता व्यर्थ चिंता न करता जिथे पारावत नाग राहतो, तिथे आम्हास घेऊन चल!' असे मृगांकदत्ताचे बोलणे ऐकून आनंदित झालेल्या त्या तपस्व्याने मृगांकदत्ताला धन्यवाद दिले. नंतर तो तपस्वी, मृगांकदत्त व त्याचे अनुयायी यांना बरोबर घेऊन पुढे चालू लागला. नागाच्या वसतिस्थानापाशी पोहोचताच त्याने सर्व दिशा मंत्रबद्ध केल्या. नंतर मृगांकदत्त व त्याचे अनुयायी यांच्या हाती मंतरलेल्या मोहोरा देऊन त्यांना वर्तुळाकार उभे केले. मग मंत्राच्या योगाने त्याने धुळीने आच्छादिलेले सरोवर प्रगट केले. एवढे करून तो तपस्वी शिंशपा वृक्षाखाली बसला. आणि त्याने यज्ञकुंड पेटवून नागनाशक मंत्र म्हणण्यास सुरुवात केली. तेव्हा त्याला नाना प्रकारची संकटे आली. पण ती त्याने आपल्या मंत्र सामर्थ्याने दूर केली.

त्यानंतर त्या शिंशपा वृक्षातून एक दिव्य स्त्री बाहेर पडली. तिच्या अनुपम सौंदर्याकडे त्या तपस्व्याची नजर जाताच त्याचा मंत्र चुकून त्याच्या हातातले होमाचे भांडे निसटून खाली पडले. त्याच क्षणी त्या सरोवरातून पारावत नावाचा नाग प्रलयकाळच्या मेघासारखा वर आला. तो भयंकर गर्जना करीत होता. आणि त्याच्या डोळ्यातून ज्वाला बाहेर पडत होत्या. अशा त्या नागाला पाहताच ती दिव्य स्त्री अदृश्य झाली. आणि भीतीने तो तपस्वी मरण पावला. आपल्या शत्रूचा नाश झालेला पाहून पारावताचा राग ओसरला. त्याने आपल्या शत्रूचे साहाय्यकर्ते म्हणगून मृगांकदत्त व त्याचे अनुयायी यांना शाप दिला की, "तुम्ही काही काळ परस्परांचा वियोग होऊन इकडे तिकडे भटकत राहाल!"

अशी शापवाणी उच्चारून पारावत पुन्हा सरोवरात अदृश्य झाला. आणि इकडे मृगांकदत्त आणि त्याचे अनुयायी यांच्या दृष्टी समोर अंधारून

आले. त्यांना बहिरेपणा आला. आणि ते सर्व एकमेकापासून इकडे तिकडे भटकत दूर झाले. ते आक्रोश करीत एकमेकांस शोधण्याचा प्रयत्न करू लागले. पण कोणीच कोणाला सापडले नाही. रात्र संपली आणि सकाळ झाली तेव्हा एकटा मृगांकदत्त त्या अरण्यात भटकत राहिला होता. आपले मंत्री कोठे गेले, ते त्याला मुळीच कळेना.

अशा प्रकारे दिवसामागून दिवस जाऊन दोन तीन महिने होऊन गेले. एके दिवशी एकाएकी श्रुतधी मृगांकदत्ताला भेटला. तो मृगांकदत्ताचा शोध करीतच फिरत होता. मृगांकदत्ताची भेट होताच श्रुतधीने त्याला वंदन केले. तेव्हा मृगांकदत्ताने त्याला विचारले, 'तू भेटलास हे फार चांगलं झालं, पण माझे सर्व मंत्री कोठे आहेत ?' तेव्हा श्रुतधी त्याला धीर देत म्हणाला, 'महाराज, मला तर ते कोठेच दिसले नाहीत. मला वाटतं ते उज्जयिनीकडे गेले असावेत. कारण आपण सर्वजण तिकडेच जाणार होतो.'

श्रुतधीचे असे बोलणे ऐकून आपणास कोठे जावयाचे आहे, ते मृगांकदत्ताच्या लक्षात आले. आणि त्याबरोबर तो उज्जयिनीची वाट चालू लागला. असाच त्यांचा काही दिवस प्रवास चालू असता एके दिवशी विमलबुद्धी त्यांना येऊन भेटला. अकस्मात झालेल्या त्याच्या भेटीने मृगांकदत्ताला फार आनंद झाला. त्याने आपल्या इतर मंत्र्यांविषयी त्याला विचारले. तेव्हा तो म्हणाला, 'ते मला कोठेही भेटले नाहीत.' ते ऐकून मृगांकदत्ताने विचारले, 'इतके दिवस तू कोठे होतास ?' तेव्हा विमलबुद्धी म्हणाला, 'पारावताच्या शापामुळे आपली ताटातूट झाली. कोण कोठे गेला ते काही कळले नाही. मी त्या अरण्यातून भटकत पूर्वेकडे निघून गेलो. खूप चालल्यामुळे मी दमलो म्हणून विसावा घेण्यासाठी एका झाडाखाली बसलो. काही वेळाने तेथे आलेल्या साधूने मला ब्रह्मदंडी ऋषींच्या आश्रमाकडे नेले. तेथे त्या मुनीनी मला दिलेली फळे खाऊन मी पाणी प्यालो. तेव्हा मी चांगला सावध झालो. त्या दयाळू मुनीने माझी सर्व हकीकत विचारून घेतली. नंतर थोडा वेळ स्तब्ध राहून तो म्हणाला, 'तू काही चिंता करू नकोस. तुम्हा सर्वांचं कल्याण होईल. कृपाळू विनायकाच्या

कृपेने मृगांकदत्ताचे इच्छित कार्य सिद्धीस जाईल आणि त्याच्यापासून दूर गेलेले त्याचे सर्व मंत्री पुन्हा त्याला भेटतील.'

असे त्या मुनीचे शब्द ऐकून मला फार आनंद झाला. दुसऱ्या दिवशी मी त्यांना वंदन करून त्यांचा निरोप घेतला व हळुहळू उज्जयिनीच्या मार्गाने जात असता आज अचानक इथं आपली भेट झाली.'' असे विमलबुद्धीचे शब्द ऐकताच मृगांकदत्ताला फार समाधान वाटले. नंतर तो श्रुतधी व विमलबुद्धी यांच्यासह पुन्हा मार्गक्रमण करून लागला. त्याचा काही दिवस प्रवास झाल्यानंतर तो नर्मदा नदीच्या काठी पोहोचला.

त्या स्वच्छ पाण्याच्या पवित्र नदीत स्नान करावे असा मृगांकदत्ताने विचार केला. त्याप्रमाणे तो नदीत उतरला. त्याचवेळी मायाबटू नावाचा एक भिल्ल राजा तेथेच स्नानार्थ आला. तो स्नान करू लागला असताना एकाएकी नदीच्या प्रवाहातून तीन सुसरी वर आल्या व त्यांनी मायाबटूला धरले. ते पाहून मायाबटूबरोबर आलेले भिल्ल सैनिक पळून गेले. तेव्हा निर्भय मृगांकदत्त आपले खड्ग घेऊन पाण्यात शिरला. त्याने त्या तिन्ही सुसरींना ठार करून मायाबटूची मुक्तता केली. मृगांकदत्त त्याला घेऊन नदीच्या काठावर येताच तो मृगांकदत्ताला वंदन करून म्हणाला. 'प्राणसंकटातून माझे प्राण वाचविणारे तुम्ही कोण ? तुम्ही कुठं निघाला आहात ?'

तेव्हा श्रुतधीने मायाबटूला सर्व वृत्त सांगितले. ते ऐकून मायाबटू मृगांकदत्ताला म्हणाला, 'महाराज, तुमचे इच्छित कार्य सिद्धीस जाण्यास मी माझ्या मातंगपती दुर्गापिशाच मित्रासह अवश्य मदत करीन. आता तुम्ही माझ्याबरोबर घरी येऊन कृपा करून माझे आतिथ्य स्वीकारावे.' अशी त्याची विनंती मृगांकदत्ताने मान्य केली. नंतर तो आपल्या अनुयायांसह मायाबटूच्या घरी गेला. तिथे मायाबटूने त्याचे उत्तम प्रकारे आतिथ्य केले. मातंगराज दुर्गापिशाचाला मृगांकदत्ताची ओळख करून दिली. तेव्हा मातंगराजाने आपल्या मित्राचे प्राण वाचविणाऱ्या मृगांकदत्ताला मोठ्या नम्रपणे वंदन करून त्याला धन्यवाद दिले. पुढे मायाबटूने जास्त आग्रह केला म्हणून मृगांकदत्त काही दिवस

त्याच्या घरी राहिला.

एके दिवशी मायाबटू आपल्या चंडकेतू नावाच्या सरदाराबरोबर द्यूत खेळत होता. त्यावेळी आकाशात मेघगर्जना होऊ लागली. ती ऐकून घरातील मोर कसे नाचतात तो पाहण्यासाठी मायाबटू उठला. तेव्हा चंडकेतू त्याला म्हणाला, 'महाराज, ते मोर चांगलं नृत्य करीत नाहीत. माझ्या घरी एक असामान्य मोर आहे तो मी तुम्हाला उद्या दाखवीन.' असे चंडकेतूचे शब्द ऐकून मायाबटू म्हणाला, 'ठीक आहे. उद्या तो मोर मला दाखविण्यास विसरू नकोस बरं का !' असे म्हणून मायाबटू आपल्या उद्योगाला निघून गेला. तिथे असलेल्या मृगांकदत्ताने तो बोलणे ऐकले होतेच.

रात्रीच्या वेळी मृगांकदत्त वेषांतर करून वाड्याबाहेर पडला. रस्त्याने जात असता अंधारात समोरून येणाऱ्या एका माणसाचा धक्का त्याला लागला. त्यामुळे मृगांकदत्ताला त्या माणसाचा फार राग आला. त्याने त्या माणसाला विचारले, 'तू कोण ?' तेव्हा तो माणूस म्हणाला, 'माझा धक्का तुला लागला म्हणून तू रागावू नकोस. अंधारामुळे तसे घडले. मी चोर आहे.' असे त्याचे शब्द ऐकून मृगांकदत्त खोटेच म्हणाला, 'माझा देखील तोच उद्योग आहे. तेव्हा आपण दोघे मित्रच झालो.' तेव्हा तो माणूस म्हणाला, 'ठीक आहे !' असे म्हणून तो मृगांकदत्ताबरोबर चालत एका जुन्या विहिरीजवळ येऊन पोहोचला. तेवढ्यात जवळच कसलातरी मोठा आवाज झाला. त्याचे कारण काय ते पाहण्याकरिता मृगांकदत्त मागे फिरला. तो आवाज कोठून आला ते शोधून काढण्याचा त्याने प्रयत्न गेला. त्यात त्याचा बराच वेळ गेला. तो जेव्हा परत विहिरीकडे आला, तेव्हा तिच्या काठावर बसलेला तो माणूस म्हणाला, 'आता खूप उशीर झाला आहे. तेव्हा तू माझ्या घरी झोपण्यासाठी चल.' मृगांकदत्ताने त्याचे म्हणणे मान्य केले. आणि तो त्या माणसाबरोबर त्याच्या घरी येताच ते घर चंडकेतूचे असून तो स्वतः चंडकेतू आहे, असे त्याने ओळखले. मृगांकदत्ताने वेषांतर केले असल्याने चंडकेतू मात्र त्याला ओळखू शकला नाही. घरी येताच चंडकेतूने ज्या खोलीत मोर होता, तेथे आपल्या दोस्ताची

झोपण्याची व्यवस्था केली. आणि त्या खोलीला बाहेरून कडी लावून तो निघून गेला. तेव्हा स्वतःच्या सुरक्षिततेसाठी मृगांकदत्ताने दाराला आतून कडी घातली. आणि तिथे असलेल्या मोराकडे बघत त्याने त्याच्या पिंजऱ्याचे दार उघडले. तेव्हा चटकन् मोर बाहेर आला व दुःखाकुळ होऊन मृगांकदत्ताच्या पायावर लोळू लागला.

हा काय चमत्कार आहे ते मृगांकदत्ताला कळेना. तेवढ्यात त्या मोराच्या गळ्यातील काळ्या दोऱ्याकडे त्याचे लक्ष गेले. त्या दोऱ्याने गळा आवळला जाऊन मोराला दुःख होत असेल असे वाटून त्याने तो सोडला. तो काय आश्चर्य! त्या मोराचे रूपांतर भीमपराक्रम मंत्र्यात झाले. तेव्हा विस्मित व आनंदित झालेल्या मृगांकदत्ताने त्याला विचारले, 'मित्रा, तू मोर बनून इथं कसा आलास ?' भीमपराक्रम म्हणाला, 'महाराज, मी झोपलो असताना एका चेटकीने माझ्या गळ्यात दोरा बांधून मला मोर केले. नंतर मी वनात फिरत असता एका व्याधाने मला पकडून चंडकेतूच्या हवाली केले. आज सुदैवाने तुम्ही माझ्या गळ्यातला दोरा काढून मला पूर्वीचे मनुष्य शरीर प्राप्त करून दिले आहे. चंडकेतू दुष्ट आहे. रात्री त्याला भेटून जो त्याचा मित्र होतो, त्याला तो मारून टाकीत असतो. त्याच हेतूने त्याने तुम्हाला येथे आणले आहे. तेव्हा आपण ताबडतोब येथून निसटून गेले पाहिजे. प्रथम हा काळा दोरा गळ्यात बांधून तुम्ही मोर व्हा आणि खिडकीतून बाहेर पडा. नंतर मी खिडकीतून हात लांब करून तुमच्या गळ्यातला दोरा काढून तुम्हाला मनुष्यरूप देईन. त्याच युक्तीने मीही येथून बाहेर येईन. कारण या खोलीच्या दरवाजाला त्या दुष्ट चंडकेतूने बाहेरून कडी घातली आहे.' भीमपराक्रमाने सुचविलेल्या युक्तीने मृगांकदत्त त्याच्यासह त्वरेने बाहेर पडला. आणि आपल्या निवासाकडे निघून गेला. त्यांना पाहून श्रुतधी व विमलबुद्धी यांना फार आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मृगांकदत्ताने मायाबटूच्या अगत्यपूर्ण आतिथ्याबद्दल त्याचे आभार मानले आणि पुढील प्रवासाला निघावे असे ठरविले. पण मायाबटूने आणखी काही दिवस आपला पाहुणचार स्वीकारावा

अशी त्याला विनंती केली. त्याप्रमाणे तो तेथे काही दिवस राहिला असता एके दिवशी मायाबटूचा सेनापती तिथे येऊन मायाबटूला म्हणाला, 'महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणे देवीला बळी देण्यासाठी आम्हाला एक महावीर प्राप्त झाला आहे. त्याने एकट्याने आपल्या पाचशे बलाढ्य वीरांना ठार मारले. अखेर आम्ही त्याला पकडून आणले आहे.' असे सेनापतीचे बोलणे ऐकून माायाबटू म्हणाला, 'त्याला इथं ताबडतोब घेऊन या.' त्याप्रमाणे जखमी झालेल्या त्या महावीराला भिल्ल राजापुढे आणताच तो महावीर म्हणजे आपला गुणाकर मंत्री आहे हे मृगांकदत्ताने ओळखले. तसे त्याने मायाबटूला सांगून त्याची ताबडतोब मुक्तता केली. नंतर भिल्ल राजाच्या आज्ञेने जखमी गुणाकरावर औषधोपचार केले गेले. त्याची प्रकृती ठीक झाल्यावर मृगांकदत्त त्याला म्हणाला, 'मित्रा, तुझी सारी हकीकत आम्हांला सांग.'

तेव्हा गुणाकर म्हणाला, 'नागाच्या शापाने आपला वियोग झाल्यावर मी त्या अरण्यातून भटकत भटकत दूर गेलो. व दैववशात् विंध्यवासिनी देवीच्या मंदिरापाशी जाऊन पाहोचलो. मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेतले. व विचार केला, आपला प्रभू व आपले मित्र आपल्यापासून दुरावले. तेव्हा आता जगून तरी काय उपयोग ? स्वतःचा बळी देऊन देवीला संतुष्ट करावे हे चांगले. अशा विचाराने मंदिराच्या कोपऱ्यात असलेली तलवार घेऊन मी स्वतःचाच शिरच्छेद करणार तेवढ्यात एक दयाळू म्हातारी तापशी तेथे आली. तिने मला त्या कृत्यापासून परावृत्त करून माझी हकीकत विचारली. नंतर ती म्हणाली, 'वत्सा, असे दुष्कृत्य करू नकोस. तुझा प्रभू आणि तुझे मित्र लवकरच भेटतील !'

असे त्या दयाळू तापसीचे शब्द ऐकून मला तुमची भेट निश्चितपणे होणार अशी आशा वाटू लागली. नंतर त्या तापसीला वंदन करून हातात खड्ग असलेला मी मंदिरातून बाहेर पडून चालू लागलो. अरण्यातून जाताना चंडिकेला बळी शोधण्यास निघालेल्या भिल्लांनी मला घेरले. त्यांच्याशी मी प्राणपणाने लढलो पण दुर्दैवाने जखमी झाल्यामुळे पकडला गेलो. नंतर त्यांनी मला इथं

आणून भिल्ल राजा मायाबटू यांच्यासमोर उभे केले. पण सुदैवाने इथं तुमची अकल्पितपणे भेट झाली. आणि माझ्या जीवाचे सार्थक झाले, असे मला वाटले.'' अशी गुणाकर मंत्र्याने सांगितलेली स्वतःची हकीकत ऐकून मृगांकदत्त संतुष्ट झाला.

नंतर काही दिवसांनी गुणाकर बरा झाल्यानंतर एके दिवशी मायाबटूचा निरोप घेऊन मृगांकदत्त, श्रुतधी, विमलबुद्धी, गुणाकर व भीमपराक्रम यांच्यासह उज्जयिनीकडे जाण्यास निघाला. त्यावेळी मायाबटू व मातंग राजा ससैन्य त्याला निरोप देण्याकरिता त्यांच्याबरोबर बरेच दूर गेले होते. ते मागे परतल्यावर मृगांकदत्त आपल्या इतर मंत्र्यांचा शोध घेत विंध्यारण्यातून चालू लागला. एके दिवशी वाटचाल करीत असता रात्र झाल्यामुळे तो आपल्या मित्रासह एका झाडाखाली झोपला. मध्यरात्री जेव्हा त्याला जाग आली तेव्हा जवळच एक कुणीतरी परका माणूस येऊन झोपलां आहे, असे त्याला दिसले. तो कोण आहे ते पाहण्याकरिता मृगांकदत्ताने पुढे जाऊन त्या माणसाच्या तोंडावरील पांघरूण काढले. तेव्हा तो आपला विचित्रकथ मंत्री आहे, असे पाहून त्याला फार आश्चर्य वाटले. तेवढ्यात विचित्रकथाला जाग आली. आपल्या प्रभूला पाहताच त्याने चटकन उठून मृगांकदत्ताला वंदन केले. त्यावेळी मृगांकदत्ताच्या इतर मंत्र्यांनाही जाग आली. अकस्मात तेथे आलेल्या विचित्रकथाला पाहून त्यांनाही फार आनंद झाला. नंतर त्यांनी विचित्रकथाला आपापली हकीकत सांगितली. आणि तू कोठे होतास असे त्याला विचारले.

तेव्हा विचित्रकथ म्हणाला, ''नागशापामुळे तुम्ही सर्व इकडे तिकडे भटकत दूर निघून गेल्यावर मी त्या अरण्यातच कितीतरी वेळ हिंडत राहिलो. मला स्थळांचे व दिशांचेही भान राहिले नव्हते. दुसऱ्या दिवशी मी त्या अरण्याच्या सीमेवर आलो. तेथे मला एक मोठे दिव्य नगर दिसले. भूक लागल्यामुळे मी अतिशय थकून गेलो होतो. त्यावेळी मला तेथे एक दिव्य पुरुष भेटला. मला पाहताच त्याने मोठ्या आपुलकीने माझी चौकशी केली. आणि

मला धीर दिला. नंतर त्याने मला त्या नगरातील आपल्या घरी नेऊन सुग्रास जेवण दिले. नंतर त्याने स्वतः भोजन केले. त्याच्यामागून त्याच्या दोन भार्यांनी जेवण केले. जेवणानंतर थोडासा विसावा घेऊन मी त्या वीरपुरुषाला विचारले, 'हे श्रेष्ठा, तू कोण ? माझ्या प्रभूचा व माझा वियोग झाल्यामुळे मला प्राणत्याग करायचा होता. अशा वेळी तू माझ्यावर का दया दाखवलीस ?' असे म्हणून मी त्याला घडलेली सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून तो सज्जन मला म्हणाला, 'मी यक्ष आहे. अतिथी म्हणून तू आज माझ्या घरी आलास. यथाशक्ती अतिथीची पूजा करणे हा गृहस्थाचा धर्म आहे. म्हणून मी तुझा सत्कार केला. देहत्यागाची इच्छा तू करू नकोस. नागशापामुळे झालेली तुमची ताटातूट काही दिवसापुरतीच आहे. त्यानंतर तुही सर्वजण पुन्हा एकत्र येणारच आहात. या संसारात दुःखरहित कोणीही नाही. मी स्वतः यक्ष असूनसुद्धा भयंकर दुःख भोगले आहे. तू आता इथे माझ्या घरीच राहा. लवकरच मी तुझी इच्छापूर्ती करीन !' त्याप्रमाणे मी काही दिवस तिथे राहिलो. आज तुम्ही आला आहात असे आपल्या विद्येने जाणून त्या दयाळू यक्षाने मी झोपेत असता मला इथे आणून ठेवले असावे, असे मला वाटते. अशा रीतीने तुम्हा सर्वांची व माझी पुनर्भेट झाली.''

अशी विचित्रकथाची विचित्र कथा ऐकून मृगांकदत्तासह सर्वांनाच मोठा विस्मय व आनंद वाटला. नंतर उरलेली रात्र त्या अरण्यात घालवून दुसऱ्या दिवशी सकाळी साहसी मृगांकदत्त आपल्या मंत्र्यांसह पुन्हा उज्जयिनीच्या मार्गाने चालू लागला.

काही दिवस प्रवास केल्यानंतर फुलाफळांनी बहरलेल्या अशा एका वनात मृगांकदत्ताने आपल्या मित्रासह प्रवेश केला.

त्या वनात त्याला एक स्वच्छ पाण्याचे सरोवर दिसले. तिथे जाऊन त्याने आपल्या मित्रासह त्या सरोवरात स्नान केले. नंतर जवळपासच्या वृक्षाची रसदार गोड फळे खाल्ली. मग तेथील एका झाडाखाली मृगांकदत्त विसावा घेण्यासाठी बसणार तेवढ्यात जवळच त्याला कसलातरी आवाज ऐकू आला.

तो कशाचा, ते पाहण्यासाठी मृगांकदत्त ज्या दिशेने आवाज आला तिकडे गेला. तेव्हा त्याला एक अद्‌भुत दृश्य दिसले.

एका झाडाखाली एक आंधळा प्रवासी बसला आहे. त्याच्याजवळच ज्याने आपल्या सोंडेतून पाणी आणि फळे आणली आहेत असा एक हत्ती त्या आंधळ्या प्रवाशाची सेवा करीत त्याच्याशी मनुष्य वाणीने बोलत आहे. अशा त्या दृश्याने मृगांकदत्ताला आश्चर्यचकित केले. लगेच त्याने खुणेने आपल्या मित्रांना बोलावून ते अद्‌भुत दृश्य दाखविले. आणि तो हलक्या आवाजात म्हणाला, 'मित्रांनो, हा हत्ती कोणी पूर्वजन्मीचा मानव असावा आणि हा आंधळा प्रवासी तर आपल्या प्रचंडशक्तीसारखाच दिसत आहे. हे मोठं आश्चर्यच आहे! ते एकमेकाशी काय बोलतात ते आपण ऐकू या. म्हणजे मग ह्या सगळ्या कोड्याचा उलगडा होईल!'

तेवढ्यात त्या हत्तीने त्या आंधळ्याला विचारले, 'तू कोण ? आंधळा असून इथं कसा आलास ?' तेव्हा तो आंधळा म्हणाला, 'मित्रा, अयोध्येचा राजा अमरदत्ताचा मुलगा मृगांकदत्त माझा प्रभू आहे. मी त्याच्या दहा मंत्र्यांपैकी एक आहे. आम्ही उज्जयिनीस चाललो असता नागशापाने आमची ताटातूट झाली. त्या शापामुळेच मी आंधळा झालो आणि भटकत इथं आलो. तू कृपा करून मला फळे, फुले, पाणी दिलेस त्याबद्दल मी तुझा फार कृतज्ञ आहे. तुझ्या कृपेने माझी जशी तहानभूक तृप्त झाली तसेच माझे अंधत्वही नाहीसे होईल असं मला वाटतं!'

असे त्या आंधळ्याचे बोलणे कानी पडताच आपल्याला वाटले त्याप्रमाणे तो आंधळा म्हणजे आपला मंत्री प्रचंडशक्तीच आहे, असे मृगांकदत्ताला कळताच त्याला फार हर्ष झाला. आणि त्याच वेळी त्याची असहाय अवस्था पाहून दुःखही झाले. तो म्हणाला, 'आताच आपण पुढे जाऊन त्याला आपली ओळख देऊ नये. कदाचित् या हत्तीच्या कृपेने त्याचे अंधत्व नाहीसे होईल. तेव्हा पुढे काय घडते ते आपण गुपचूपपणे पाहू या!' तेवढ्यात प्रचंडशक्तीने हत्तीला विचारले, 'आता तू कोण ? तुला हत्तीचा जन्म कसा प्राप्त

२६८३ ३७३/८
८७ ८१



झाला व तू मनुष्यप्रमाणे बोलतोस कसा, ते सर्व तू मला सांग.' तेव्हा एक मोठा निःश्वास टाकून तो म्हणाला, 'मित्रा, मी मूळचा गंधर्व आहे. मला भूलोकी राजकुलात जन्मा घ्यावा लागला. भीमभट या नावाने राज्य करीत असता एकदा उत्तंक नावाचे मुनी मला भेटण्यास आले. पण मी सुखोपभोगात दंग असल्याने त्या मुनींचे यथायोग्य स्वागत केले नाही. तेव्हा रागवून त्या मुनीने 'तू राज्यभ्रष्ट होऊन रानटी हत्ती होशील' असा मला शाप दिला. तेव्हा मुनींची क्षमा मागून मी त्यांची प्रार्थना केली. मग त्यांचा राग शांत झाला. आणि त्यांनी मला उःशाप दिला की, नागशापाने आंधळा झालेल्या प्रचंडशक्ती नावाच्या मृगांकदत्ताच्या मंत्र्याचे जेव्हा तू आतिथ्य करशील व त्याला आपली हकीकत सांगशील तेव्हा तू शापमुक्त होशील व पुन्हा गंधर्व होशील. त्याच वेळी त्या मंत्र्यालाही दृष्टी प्राप्त होईल !'

अशी आपली हकीकत प्रचंडशक्तीला सांगून हत्तीरूपी भीमभट म्हणाला, ''मित्रा, मी तो भीमभट आणि तोच तू प्रचंडशक्ती. तेव्हा आता मी कोणत्याही क्षणी शापमुक्त होईन.'' असे त्याचे बोलणे संपताच त्याचे हत्तीचे रूप नाहीसे होऊन त्याला ऐश्वर्ययुक्त गंधर्वाचे रूप प्राप्त झाले. त्याच क्षणी प्रचंडशक्तीला पूर्वीसारखी दृष्टी प्राप्त झाली. आणि त्याला फार आनंद झाला. त्याचवेळी त्या दोघांचे संभाषण लपून ऐकणारा मृगांकदत्त धावत पुढे गेला. आणि आपल्या मित्राला भेटला. तेव्हा या दोघांना गहिवरून आले. ते पाहून भीमभटाने त्या दोघांचेही समाधान केले. मृगांकदत्ताने मोठ्या कृतज्ञतेने भीमभटाला वंदन केले. तेव्हा तो मृगांकदत्ताला म्हणाला, ''महावीरा, लवकरच तुझे इतर मंत्री तुला भेटतील. शशांकवतीही तुला प्राप्त होईल. आणि तू पृथ्वीपती होशील. धैर्य धर. माझे स्मरण करताच मी तुला भेटेन !'' एवढे बोलून तो गंधर्व आकाशात उडून गेला. नंतर तो दिवस व रात्र त्या वनातच मोठ्या आनंदात घालवून दुसऱ्या दिवशी पहाटेच मृगांकदत्त आपल्या मित्रांसह पुन्हा उज्जयिनीकडे जाण्यास निघाला.

बराच वेळ मार्गक्रमण केल्यानंतर एका अक्राळ विक्राळ व धिप्पाड

पुरुषाच्या खांद्यावर बसून आकाशातून जात असलेला आपला मंत्री विक्रमकेसरी मृगांकदत्ताने पाहिला. तेव्हा विस्मित होऊन मृगांकदत्त आपल्या मित्रांना तो चमत्कार दाखविणार तोच विक्रमकेसरी मोठ्या त्वरेने खाली येऊन जमिनीवर उतरला. आणि पुढे धावत जाऊन त्याने मृगांकदत्ताला वंदन केले. नंतर विक्रमकेसरीने 'मी आठवण करीन तेव्हा तू ये' असे सांगून त्या धिप्पाड पुरुषाला निरोप दिला. तो गेल्यावर मृगांकदत्त सर्वांसह एका झाडाखाली बसला, व त्याने विक्रमकेसरीला स्वतःची हकीकत सांगण्याची आज्ञा केली.

तेव्हा विक्रमकेसरी म्हणाला, "महाराज, आपणा सर्वांची ताटातूट झाल्यावर मी पुष्कळ दिवस तुमच्या शोधार्थ भटकलो. अखेर आपली उज्जयिनीस भेट होईल असे वाटून मी तिकडे निघालो. प्रवास करीत मी ब्रह्मस्थल नावाच्या गावी पोहोचलो. तेथे एका विहिरीच्या काठावर असलेल्या झाडाखाली मी विसावा घेण्यासाठी थांबलो. तेवढ्यात सर्पदंशाने व्याकुळ झालेला एक म्हातारा तेथे आला आणि म्हणाला, "वत्सा, त्या जागी बसू नकोस. इथं एक महासर्प आहे. तो मला विनाकारण चावला, त्यामुळे मला असह्य वेदना होत असून याच विहिरीत उडी टाकून मी आत्मनाश करण्यास तयार झालो आहे." ते ऐकून मी मला अवगत असलेल्या विषविद्येने त्या ब्राह्मणाच्या अंगातील विष काढून टाकले. तेव्हा आनंदित झालेल्या त्याने माझी सर्व हकीकत ऐकून घेतली आणि तो मला म्हणाला, "हे वीर पुरुषा, तू मला जीवदान दिलेस. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माझ्या वडिलाने मला दिलेला वेताळाचा मंत्र मी तुला देतो." तेव्हा मी त्याला म्हणालो, "आजोबा; माझ्या प्रभूची आणि माझी ताटातूट झाल्यामुळे मला वेताळाला प्रसन्न करून घेऊन काय करायचे आहे ?" तेव्हा तो हसून मला म्हणाला, "अरे खुळ्या, वेताळापासून इच्छिलेले सर्व काही मिळविता येते, हे तुला कसे माहित नाही ? तेव्हा माझ्यापासून तू वेताळ कृपेचा मंत्र घे. त्याच्या योगाने तुला तुझ्या प्रभूला भेटणे शक्य होईल." तेव्हा त्या वृद्धाचे सांगणे मी मान्य केले. त्याने दिलेला वेताळाचा मंत्र घेऊन मी उज्जयिनीला गेलो. तेथे जाऊन मी त्या मंत्राने

वेताळाला प्रसन्न करून घेतले. तेव्हा त्याने वर मागण्याविषयी मला सांगितले असता मी म्हणालो, 'जेथे माझा प्रभू मृगांकदत्त असेल तेथे मला घेऊन चल!' त्याप्रमाणे त्या वेताळाने तुम्हाला इथे पाहून मला आकाशातून खाली उतरविले, अशी माझी हकीकत आहे."

नंतर मृगांकदत्त आपल्या सात मित्रांसह पुढे निघाला. बराच वेळ प्रवास केल्यानंतर त्याने एका अरण्यात प्रवेश केला. ते अरण्य पार करीत असता त्याने एक स्वच्छ पाण्याने भरलेले सरोवर पाहिले. त्या सरोवराच्या काठी पुष्कळ झाडी होती. त्यामध्ये अनेक मोठ्या फांद्यांचा असा एक फार उंच वृक्ष त्यांच्या नजरेस पडला. त्याच्या फांद्यांवरून रसदार फळे लोंबत होती. मृगांकदत्त त्या झाडाकडे बघत असता, भूक आणि तहान यांनी व्याकुळ झालेले त्याचे मंत्री ती फळे खाण्यासाठी पुढे धावत गेले. आणि त्या वृक्षावर चढले. तो काय आश्चर्य! ते सहाही मंत्री त्या झाडाची फळे होऊन राहिले.

तेव्हा मृगांकदत्ताला आपल्या मित्रांच्या वियोगाने अतिशय दुःख होऊन मूर्च्छा आली. तेव्हा झाडावर न चढलेल्या श्रुतधीने त्याला सावध करून म्हटले, 'महाराज, धैर्य सोडून असे निरुत्साही होऊ नका. संकटसमयी जो विचलित होत नाही, त्याचेच कल्याण होते. नागशापामुळे दूर गेलेले हे सहा मित्र पुन्हा येऊन भेटले. तसेच त्यांची पुन्हा भेट होईल.' तेव्हा मृगांकदत्त म्हणाला, "मित्रा, आमचा नाश व्हावा म्हणूनच विधात्याने आमच्यावर एकामागून एक संकटे आणलेली आहेत. मला वाटतं त्या झाडावरील एखाद्या भुताने त्यांना खाऊन टाकले असावे. आता मला तरी जगून काय करावयाचे?" असे म्हणून मृगांकदत्त त्या सरोवरीत उडी टाकण्यासाठी निघाला. त्या क्षणी आकाशवाणी झाली, "वत्सा, असं भलतं साहस करू नकोस. अखेर तुझं कल्याणच होणार आहे. हे झाड गणपतीचं वस्तीस्थान आहे. तिथे तुझे मंत्री हातपाय न धूता अपवित्र स्थितीत गेले. त्यांनी फळांना हात लावताच त्यांचे फळात रूपांतर झाले. कारण 'त्यांचे चित्त ज्यामध्ये आसक्त झाले आहे ते रूप त्यांना मिळो.' असा त्यांना गणेशाने शाप दिला आहे. या

सहा सचिवांखेरीज तुझ्या चार मंत्र्याचीही तशीच गत झालेली आहे. तेव्हा तू गणेशाची प्रार्थना कर. त्याच्या कृपेने तुझे इच्छित कार्य सिद्धीस जाईल !'' अशी आकाशवाणी ऐकून मृगांकदत्ताला आनंद झाला. त्याने त्या सरोवरात स्नान केले.

नंतर त्या झाडात असलेल्या गणेशाचे मोठ्या भक्तिभावाने पूजन केले. आणि हात जोडून त्याची एकाग्रतेने प्रार्थना केली. त्या दिवशी त्याने उपवास केला. अशा प्रकारे त्याने अकरा दिवस गणेशाची प्रार्थना केली. बाराव्या दिवशी गणेश त्याच्या स्वप्नात येऊन म्हणाला, ''वत्सा, उपासनेने मी संतुष्ट झालो आहे. तुझे सर्व मंत्री तुला भेटतील. शशांकवती तुला प्राप्त होईल. तू पृथ्वीपती होशील.'' असे स्वप्न मृगांकदत्ताने सकाळी उठल्यावर श्रुतधीला सांगितले. नंतर स्नान करून गणेशाची पूजा झाल्यावर मृगांकदत्त त्या झाडाला प्रदक्षिणा घालू लागला. तोच फळे होऊन राहिलेले त्याचे दहाही मंत्री तेथे आले आणि त्यांनी त्याला वंदन केले. ते पाहून मृगांकदत्ताला अवर्णनीय आनंद झाला. त्या मंत्र्यांनाही आपल्या प्रभूच्या पुनर्भेटीमुळे अत्यंत हर्ष झाला. नंतर मृगांकदत्ताने आपल्या सर्व मंत्र्यांसह तिथेच राहून आपल्या उपवासाचे पारणे सोडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मृगांकदत्त आपल्या सर्व मंत्र्यांसह गणेश वृक्षाला वंदन करून उज्जयिनीकडे निघाला. मार्गात नाना प्रकारचे चमत्कार पाहात तो यथावकाश प्रवास करीत उज्जयिनी नगरात पोहोचला. तिथे असलेल्या गंधवती नदीत त्याने सर्वांसह स्नान करून आपल्या प्रवासाचा शीण घालविला. नंतर नदीतून पोहत जाऊन मृगांकदत्त आपल्या मंत्र्यांसह नगराजवळ गेला. तेव्हा अनोळखी माणसास नगरीत प्रवेश करता येणे शक्य नाही, एवढी ती दुर्गम असल्याचे त्याला दिसले. तेव्हा तो खिन्न होऊन म्हणाला, ''आपणास या नगरात प्रवेश करणे शक्य नाही तर शशांकवतीची प्राप्ती होणार कशी ?'' असे मृगांकदत्ताचे शब्द ऐकून त्याचे मंत्री म्हणाले, 'सर्व बाजूंनी संरक्षित अशा त्या नगरात आपणास बळाने शिरता येत नसेल तर बुद्धीचा

उपयोग करून काहीतरी युक्ती योजली पाहिजे.'

नंतर काही दिवस तो त्या नगराबाहेरच भटकत राहिला. एकदा त्याचा मित्र विक्रमकेसरी याला वाटले की, 'आपणास प्रसन्न असलेल्या वेताळाकडून शशांकवतीला तिच्या महालातून घेऊन यावे.' म्हणून त्याने वेताळाचे स्मरण केले. त्याबरोबर तो प्रकट होताच विक्रमकेसरीने त्याला तशी आज्ञा केली. तेव्हा तो वेताळ म्हणाला, 'या नगरीला महादेवाचा वर असल्यामुळे मी नगरात प्रवेश करू शकत नाही.' मग निराश झालेल्या मृगांकदत्ताने सर्वांसह त्या त्या नगरात बळेच जाण्याचा निश्चय केला. तेव्हा श्रुतधी त्याला म्हणाला, "महाराज, तुम्ही नीती जाणणारे आहात. तेव्हा असा अविचार का करता ? या नगराच्या चार प्रवेशद्वारात प्रत्येकी दोन हजार हत्ती, पंचवीस हजार घोडे, दहा लक्ष रथ व पायदळ एवढं सैन्य नगर रक्षणार्थ सिद्ध असताना आम्ही नगरात जाण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आत्मघातच आहे. तेव्हा तुम्ही, भिल्लराज, शक्तिरक्षित, मायाबटू व मातंगराज हे जे पराक्रमी व बलाढ्य मित्र मिळविले आहेत, त्यांची यावेळी मदत घ्या. त्यासाठी प्रथम आपण विंध्याद्रीच्या दक्षिणकडे असलेल्या मातंगराजाच्या निवासस्थानाकडे जाऊ. आणि तिथेच मायाबटू व शक्तिरक्षित यांना बोलावून घेऊ. त्या सर्वांनी तुम्हाला वेळप्रसंगी मदन करण्याचं यापूर्वीच आश्वासन दिलेलं आहे!'

असे श्रुतधीचे योग्य बोलणे मृगांकदत्ताला पसंत पडले. त्याप्रमाणे तो आपल्या मंत्र्यांसह विंध्याद्रीकडे निघाला. यथावकाश प्रवास करीत तो त्या पर्वतापाशी पोहोचला. नंतर तो चढून त्याच्या माथ्यावर जाताच त्याला दक्षिणेकडे पसरलेली भिल्लवस्ती दिसली. तेव्हा पर्वतावरून खाली उतरून तो त्या भिल्लवस्तीकडे निघाला. आता तिथे मातंगाधिपतीचा शोध कुठे घ्यायचा असा मृगांकदत्ताला प्रश्न पडला. तेवढ्यात समोरून येणारा एक मुनिपुत्र त्याला दिसला. त्याला विचारताच तो मृगांकदत्ताला म्हणाला, 'येथून एका कोसावर असलेल्या पंचवटी नावाच्या प्रदेशात अगस्ती मुनींचा आश्रम आहे. त्याच्या जवळ असणाऱ्या विंध्य पर्वताच्या शिखरावर करभग्रीन नावाचा दुर्गम कोट

आहे. तिथं चंडप्रतापी व महाबलाढ्य मातंगाधिपती राहतो.'

अशा मुनिपुत्राच्या मार्गदर्शनाप्रमाणे मृगांकदत्त आपल्या परिवारासह त्वरेने करभग्रीन कोटापाशी पोहोचला. त्या कोटाच्या चहु बाजूस भिल्लवस्ती होती. कोटाचा मार्ग मृगांकदत्त कोणालातरी विचारणार तोच तेथे असलेल्या मायाबटूच्या सेवकांनी त्याला ओळखले आणि त्याच्या आगमनाचे वृत्त आपल्या राजाला सांगितले. तेव्हा आनंदित झालेल्या मायाबटूने ससैन्य समोरे जाऊन मृगांकदत्ताचे सवागत करून त्याला वंदन केले. आणि त्वरेने ही वार्ता मातंगाधिपतीस कळविली. तेव्हा तो महाबलाढ्य आणि तेजस्वी मातंगाधिपती आपल्या अफाट सैन्यासह तेथे आला. मृगांकदत्ताला प्रणाम करून तो म्हणाला, 'विंध्यवासिनी देवीची कृपा म्हणूनच आपण आज माझ्या घरी येऊन मला धन्य केले.' असे म्हणून त्याने मृगांकदत्तास मोती कस्तुरी इत्यादी अमूल्य वस्तूंची भेट देऊन त्यांचे हार्दिक स्वागत केले.

नंतर भोजन व विश्रांती झाल्यावर मायाबटू व मातंगाधिपती यांनी विचारल्यावरून मृगांकदत्ताने आपणास उरलेल्या मंत्र्यांची प्राप्ती कशी झाली ते सांगून, सैन्याच्या कडेकोट बंदोबस्तामुळे उज्जयिनी किती दुर्गम आहे हेही कथन केले. आणि अखेर तो म्हणाला, 'मित्रांनो, अशा परिस्थितीत माझं इच्छित कार्य कसं सिद्धीस जाईल ते मला सांगा!' असे मृगांकदत्ताचे शब्द व वृत्त ऐकून मायाबटूसह मातंगाधिपती त्याला म्हणाला, 'महाराज, तुम्ही निश्चिंत राहून थोडा धीर धरा. आम्ही आमच्या प्रतापानं कर्मसेन राजाला त्याच्या कन्येसह इथं घेऊन येतो.' अशा त्यांच्या आश्वासनाने मृगांकदत्ताला समाधान वाटले. व त्याने त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले.

दुसऱ्या दिवशी मृगांकदत्ताने गुणाकर मंत्र्याला आपला मित्र किरातराज शक्तिरक्षित याला ससैन्य आणण्यासाठी पाठविले. काही दिवसांनी गुणाकराबरोबर शक्तिरक्षित, दहा हजार हत्ती, दोन लाख घोडे, अठ्ठ्याऐंशी हजार रथ व दहा लाख पायदळ एवढ्या प्रचंड सैन्यासह तेथे येऊन पाहोचला. तेव्हा मृगांकदत्ताने आपल्या मित्रांसह पुढे जाऊन त्याचे मोठ्या आनंदाने

स्वागत केले. आता मातंगाधिपती, मायाबटू व शक्तिरक्षित यांच्या भयंकर सैन्याचा तेथे एक महासागरच निर्माण झाला.

नंतर एके दिवशी सर्वांसमवेत भोजन झाल्यावर मृगांकदत्त म्हणाला, 'आता इथे व्यर्थ वेळ न घालविता उज्जयिनीवर चढाई करण्यास निघावं, असं मला वाटतं!' तेव्हा श्रुतधी म्हणाला, 'महाराज, नीतिज्ञ असं सांगतात की शत्रूला जिंकण्यासाठी प्रथम साम, दाम, दंड, भेद या उपायांचा अवलंब करावा. सर्वात साम हा श्रेष्ठ आहे. राजा कर्मसेन निर्लोभी, जनप्रिय व अजिंक्य आहे. शिवाय त्याची कन्या प्राप्त करून घ्यायची असल्याने त्या कन्येच्या नातलगांना मारणं हे अयोग्य आहे. तेव्हा मला असं वाटतं की कर्मसेनाकडं प्रथम आपला दूत पाठवावा. आपलं कार्य सफल झालं नाही तरच अखेरचा उपाय म्हणून त्यांच्याशी युद्ध करावं!'

असे श्रुतधीचे योग्य बोलणे सर्वांना पसंत पडले. त्याप्रमाणे मृगांकदत्ताने शशांकवतीला मागणी घालण्याबद्दलचा लेखी संदेश, सुविग्रह नावाच्या दूताजवळ देऊन त्याला उज्जयिनीकडे पाठविले. यथावकाश उज्जयिनीस पोहोचल्यावर सुविग्रहाने राजसभेत भव्य सिंहासनावर बसलेल्या कर्मसेन राजाची भेट घेतली आणि त्याला वंदन करून मृगांकदत्ताचा संदेश त्याच्या हाती दिला. तो राज्यमंत्राने मोठ्यांदा वाचून दाखविला. त्यातील मजकूर ऐकून रागावलेला राजा म्हणाले, 'अयोध्येचे राजे आमचे शत्रू आहेत. आम्हाला लिहिताना आमच्या नावाऐवजी मृगांकदत्ताने आपलंच नाव आधी घातलं आहे. आमचं नाव नंतर लिहून त्यानं आम्हाला कमी लेखलं आहे. शिवाय मागणी मान्य न झाल्यास बळाचा उपयोग करण्याची धमकीही या पत्रात असल्यानं, हे दूता, आमचा नकार हेच तोंडी उत्तर तू आपल्या प्रभूला जाऊन सांग!'

असे कर्मसेनाचे बोलणे सुविग्रहाने मृगांकदत्ताकडे परत जाऊन त्याला सांगितले. तेव्हा आपल्या मित्रांचा विचार घेऊन मृगांकदत्ताने युद्धाची तयारी केली. नंतर एके दिवशी आपल्या बलाढ्य मित्रांसह अफाट सैन्याचा महासागर

बरोबर घेऊन मृगांकदत्त उज्जयिनीकडे निघाला. विध्यांद्री ओलांडून तो काही दिवसांनी आपल्या सैन्यासह उज्जयिनी नगराच्या सीमेवर येऊन पाहोचला. ते वृत्त कळताच युद्धास सज्ज असलेला राजा कर्मसेन आपल्या सैन्यासह नगराबाहेर पडला.

नंतर दोन्ही सैन्यांची गाठ पडताच त्यांच्यात घनघोर युद्ध सुरू झाले. बाणांचा वर्षाव होऊ लागला. तलवारींचा खणखणाट सुरू झाला. वीरांच्या गर्जनांनी आकाश भरून गेले. त्या भयंकर रणधुमाळीने दिशा दिसेनाशा झाल्या. रक्ताचे पाट वाहू लागले. उभयपक्षी मनुष्यबळाची हानी आणि युद्धसाहित्याची अपरिमित हानी होऊ लागली. असा भयंकर रणसंग्राम पाच दिवस चालला.

पाचव्या दिवशी संध्यासमयी मृगांकदत्त आपल्या मित्रांसह बसला असताना श्रुतधी त्याला म्हणाला, ''महाराज, आज मी भिक्षुक वेषाने उज्जयिनी नगरात गेलो होतो. जवळच्या माणसालाही दिसू नये अशी मी माझ्या विद्यासामर्थ्यानं व्यवस्था केली होती. त्यामुळं मला कुणीही अडविलं नाही. नगरात गेल्यावर मला असं कळलं की आपल्या वडिलांना जयप्राप्ती व्हावी म्हणून शशांकवतीने उपासनेसाठी गौरीच्या मंदिरात वास्तव्य केलं आहे. ती आपल्या चतुरिका सखीला म्हणाली, 'सखे, माझ्यामुळं बाबांना युद्ध करावं लागतंय. राजपुत्राकडून ते पराजित झाले तर ते मला त्याच्या स्वाधीन करणार. पण तो राजपुत्र देखणा आणि अनुरूप आहे का याची मला कल्पना नाही. तेव्हा तू राजपुत्राच्या सैन्यात जाऊन तो समक्ष पाहून ये!' त्याप्रमाणे शशांकवतीची सखी मोठ्या चातुर्याने इथं येऊन तुम्हाला प्रत्यक्ष पाहून परत गेली. आणि तुम्ही फार देखणे आणि अनुरूप आहात असे तिनं राजकन्येला सांगितलं. तेव्हापासून तुम्हालाच वरण्याचा तिनं निश्चय केला आहे. तेव्हा आज रात्री तुम्ही गुप्तपणे नगरातील गौरीमंदिरात जाऊन तिला बरोबर घेऊन सरळ मायाबटूच्या कांचननगराकडे प्रयाण करा. येथील शत्रुसैन्याचा समाचार घेण्यास हे राजे समर्थ आहेत. आता युद्ध पुरे झालं. यापुढं सैन्य हानी नको.

सर्वजण सुखरूप व सुरक्षित राहोत!'

अशा श्रुतधीच्या सल्ल्याप्रमाणे करण्याचे मृगांकदत्ताने ठरविले. तो आपल्या सचिवासह गुप्तपणे नगरात शिरून पुष्पकरंड नावाच्या बागेतील गौरीमंदिराकडे गेला. त्यावेळी चंद्रोदय झाला होता. मंदिरात जागी असलेली शशांकवती स्वतःशी विचार करू लागली. 'या भयंकर रक्तपात होत असलेल्या युद्धाला मीच कारणीभूत आहे. देवीने स्वप्नात येऊन सांगितले की युद्ध करणारा राजपुत्रच तुझा गत जन्मीचा पती असून या जन्मीही तोच तुझा पती होणार आहे पण ते कसं शक्य होईल! बाबा तर माझा हात त्याच्या हाती देणार नाहीत हे तर निश्चितच आहे. तेव्हा बाबांच्या व त्या राजपुत्राच्या जीविताला काही अपाय झाला नाही तोवरच आपण देहत्याग करावा, हे चांगले!' असा विचार करून शशांकवती मंदिरासमोरच्या अशोक वृक्षापाशी गेली आणि त्याच्या फांदीला आपले उत्तरीय वस्त्र बांधून तिने त्याचा फास तयार केला. तो ती गळ्याला लावणार तोच अकस्मात जाग्या झालेल्या तिच्या सख्या शोधार्थ तिथे धावत आल्या. त्यांनी तिला त्या अयोग्य कृत्यापासून परावृत्त केले.

तेवढ्यात आपल्या सचिवासह त्या बागेत आलेला मृगांकदत्त अत्यंत विस्मित होऊन ते दृश्य पाहू लागला. आणि त्याचवेळी गौरीच्या गाभाऱ्यातून आकाशवाणी झाली. 'पुत्री शशांकवती, असा अविचार करू नकोस. मी तुला स्वप्नात सांगितल्याप्रमाणं तुझा पूर्वजन्मीचा पती मृगांकदत्त येऊन तुझ्या मागं उभा आहे. त्याच्याबरोबर तू जा आणि सुखानं राज्यवैभवाचा आस्वाद घे.' अशी आकाशवाणी ऐकून विस्मित झालेल्या शशांकवतीने हलकेच मागे वळून पाहिले. तेव्हा आपल्या सचिवांच्या मेळ्यातून पुढे आलेला तेजस्वी मृगांकदत्त तिच्या दृष्टीस पडला. त्यावरोबर ती लज्जांकित होऊन स्तब्ध उभी राहिली.

तेव्हा शशांकवतीच्या दिव्य सौंदर्याने मोहित झालेला मृगांकदत्त तिच्याजवळ जाऊन म्हणाला, 'कल्याणी, तुझ्या गुणांनी मला आकर्षित करून राज्य व नातलग यांच्यापासून दूर करून इथं आणलं. मी आजपर्यंत खूपच शारीरिक आणि मानसिक ताप सहन केला. पण तुला पाहून त्याचं सार्थक झालं,

असं मला वाटतं. माझ्यावरील प्रेमामुळे तू आपला हात माझ्या हातात देण्यास तयार आहेस ना?' असे मृगांकदत्ताचे शब्द ऐकून शशांकवती हलकेच म्हणाली, 'आर्यपुत्र, आपल्या तेजस्वी गुणांनी मला माझ्या सख्यांसह जिंकून घेतलं आहे. आता सर्वांना कल्याणकारक होईल असं आपण करावं!' ते ऐकून संतुष्ट झालेल्या मृगांकदत्ताने प्रथम गौरीची प्रार्थना करून तिला वंदन केले. नंतर त्याने शशांकवतीला आपल्या मागे घोड्यावर घेतले. त्याच्या सचिवांनीही तिच्या सख्यांच्या बाबतीत त्याचे अनुकरण केले. नंतर ते दहा सशस्त्र वीर दौडत नगराच्या वेशीतून बाहेर पडले. त्यांना कुणीही रोखू शकले नाही. नगराबाहेर पडलेला मृगांकदत्त शशांकवतीसह सुखरूपपणे मायाबटूच्या कांचननगराकडे निघून गेला.

इकडे कर्मसेन राजाला मृगांकदत्त नगरात शशांकवतीचे हरण करण्याकरिता गेल्याचे हेराकडून वृत्त कळले. तेव्हा त्याने लगेच सेनापतीला 'मृगांकदत्ताला मार किंवा पकड' अशी आज्ञा करून पाचशे घोडेस्वारासह नगराकडे पाठविले. पण तिकडून आलेल्या नगराध्यक्षाने, 'नगरात शिरलेल्या दहा वीरांनी राजकन्येला वेगळ्या मार्गानं पळवून नेलं.' हे वृत्त त्याला मार्गातच सांगितले. तेव्हा सेनापतीने नगराध्यक्षासह राजाकडे जाऊन त्याला घडलेली सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून राजाला जरी राग आला तरी मृगांकदत्ताच्या धाडसाचे त्याला मानातल्या मनात कौतुकच वाटले.

दुसऱ्या दिवशी सकाळी कर्मसेन राजाने आपल्या दूताकडून मृगांकदत्ताच्या शिबिरातील राजांकडे असा निरोप पाठविला की 'मृगांकदत्ताने कपटाचरणाने माझ्या कन्येचे हरण केले असले तरी तिला तो अनुरूपच असल्याने त्याने तुम्हा सर्वांसह माझ्या नगरात यावे. म्हणजे यथाशास्त्र विवाहविधीने मी माझी कन्या त्याला देईन.' असा निरोप ऐकून मायाबटू वगैरे राजांनी त्या दूताजवळ आपला निरोप दिला, 'आपले म्हणणे मान्य आहे. आपण आपल्या सैन्यासह नगरात गमन केल्यावर आम्ही मृगांकदत्ताला बरोबर घेऊन आपणाकडे येऊ.'

असा निरोप दूताने कर्मसेनाला सांगताच तो आपल्या सैन्यासह नगरात गेला. आणि श्रुतधीसह मायाबटू प्रभृती राजे कांचननगराकडे गेले. दुसऱ्या दिवशी तेथे पोहोचताच त्यांची व मृगांकदत्ताची भेट झाली. तेव्हा त्यांनी मृगांकदत्ताला कर्मसेन राजाचा निरोप सांगितला. त्यावर चर्चा होऊन विवाहासाठी सर्वांनी उज्जयिनीस जावे असे ठरले. मग आपल्या आईवडिलांना घेऊन येण्यासाठी मृगांकदत्ताने भीमपराक्रम मंत्र्यास अयोध्येला पाठविले.

तिकडे अयोध्येत अमरदत्त राजाला, मंत्र्यांच्या कुटिल कारस्थानामुळे आपल्या पुत्राला हद्दपार व्हावे लागले हे जेव्हा कळले, तेव्हा त्याने त्या मंत्र्याला देहांत शासन दिले. नंतर पुत्रवियोगाने दुःखित होऊन तो राणीसह अयोध्येजवळील नंदिग्रामातील हरिमंदिरात राहून तपश्चर्या करीत होता. वेगवान घोड्यावरून दौडत गेलेला भीमपराक्रम लवकरच अयोध्येला पोहोचला. तिथे त्याला राजा व राणी नंदिग्रामातील हरिमंदिरात असल्याचे कळले. तेव्हा तडक तिथे जाऊन त्याने राजा व राणीची भेट घेतली आणि त्यांना नम्रपणे वंदन केले. राजाने मृगांकदत्ताबद्दल त्याला विचारले तेव्हा भीमपराक्रमाने राज्यातून बाहेर पडल्यापासून ते शशांकवतीसाठी कर्मसेन राजाशी झालेल्या युद्धापर्यंतची सर्व घडलेली हकीकत राजाला कथन केली. आणि अखेर तो म्हणाला, "आता मृगांकदत्त शशांकवतीसह मायाबटू राजाच्या कांचननगरात असून त्यानेच मला आपणास घेऊन येण्याची आज्ञा केली आहे." असे भीमपराक्रमाने सांगितलेले वृत्त ऐकून राजा व री यांना आपल्या पुत्राने सोसलेल्या हालअपेष्टांबद्दल दुःख वाटले आणि त्याचा पराक्रम व क्षेमकुशल ऐकून फार आनंदही झाला.

दुसऱ्या दिवशी अमरदत्त राजा राणीसह हत्तीवर आरूढ होऊन आपले सचिव व चतुरंग सैन्य यांच्यासह कांचननगराकडे निघाला. काही दिवसांनी तो कांचननगरास पोहोचला. तेव्हा आपले मित्र राजे व मंत्री यांच्यासह पुढे आलेल्या मृगांकदत्ताने धावत जाऊन आपल्या मात्यापित्यांच्या चरणांना वंदन केले. लगेच अमरदत्त हत्तीवरून खाली उतरला. फार दिवसांनी भेटलेल्या

आपल्या एकुलत्या एक मुलाला त्या दोघांनी अश्रूंनी न्हाऊ घातले. त्या दृश्याने तेथे असलेल्या सर्वांचेच डोळे पाण्याने भरून आले. नंतर मृगांकदत्ताने आपल्या पित्याला मित्रराजांची ओळख करून दिली. तेव्हा आपल्या पुत्रास संकटकाळी साह्य करणाऱ्या त्या वीर श्रेष्ठांना राजाने अनेक धन्यवाद दिले. नंतर सर्वजण मायाबटूच्या निवासस्थानी गेले. तेव्हा तेथे असलेल्या शशांकवतीने पुढे येऊन आपल्या सासा सासऱ्यास नम्रपणे नमस्कार केला.

दुसऱ्या दिवशी कर्मसेनाचा निरोप घेऊन दूत आला. 'तुमचे इकडे येण्याचे चिन्ह दिसत नाही, तेव्हा मी सुषेण पुत्राला तिकडे पाठवितो. तो यथाशास्त्र कन्यादान करील.' तेव्हा अमरदत्ताने त्या दूताबरोबर प्रतिसंदेश दिला, 'ठीक आहे. सुषेण आल्यानंतर आपण व तो संतुष्ट व्हाल असे आम्ही लग्नकार्य करू.' नंतर सर्वांच्या विचाराने अमरदत्ताने विवाहकार्य अयोध्येत करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे सुषेणास घेऊन येण्यास मायाबटूस मागे ठेवून अमरदत्त उरलेल्या सर्वांसह आपल्या नगरास परत गेला. मृगांकदत्ताच्या आगमनाप्रीत्यर्थ नगरात महोत्सव साजरा झाला. नंतर ज्योतिषाला विचारून लग्नतिथी निश्चित करण्यात आली.

काही दिवसांनी मायाबटू सुषेणासह नगरसीमेवर आल्याचे कळताच मृगांकदत्त ससैन्य त्यांना सामोरा गेला. त्याने सुषेणाचे हार्दिक स्वागत केले. नंतर त्याला घेऊन तो मायाबटूसह राजमंदिरात गेला. तेथे अमरदत्तानेही त्याचा सत्कार केला. मग त्याने शशांकवतीची भेट घेतली.

ठरलेल्या तिथीला मृगांकदत्त व शशांकवती यांचा विवाह समारंभ मोठ्या ऐश्वर्यात साजरा झाला. विवाहसमयी सुषेणाने शशांकवतीचा हात मृगांकदत्ताच्या हाती दिला. आणि त्या दोघांना अपार हत्ती घोडे यासह सोने, उंची वस्त्रे व रत्नजडित अलंकार दिले. त्यावेळी अमरदत्तानेही खूप दाने दिली.

पुढे काही दिवसांनी सुषेण व मित्र राजे स्वनगरास जाण्यासाठी निरोप मागू लागले. तेव्हा अमरदत्ताने सुषेणास उंची वस्त्रांचा आहेर करून एक देश,

हत्ती, घोडे, वस्त्रे व सोने दिले. मायाबटू, शक्तिरक्षित, मातंगाधिपती यांना व त्यांच्या कुटुंबियांना मोठ्या देणग्या दिल्या. त्याचप्रमाणे त्याने श्रुतधी व मृगांकदत्ताचे दहा सचिव यांचाही यथायोग्य सन्मान केला.

नंतर अमरदत्ताने काही वर्षे मोठ्या आनंदाने राज्य केले. पुढे त्याने मृगांकदत्ताला राज्याभिषेक करून आपल्या गादीवर बसविले. आणि तो आपल्या राणीसह पुण्यक्षेत्र वाराणसीत जाऊन राहिला.

काही वर्षे कुशलतेने राज्यकारभार केल्यानंतर मृगांकदत्ताने मायाबटू प्रभृती व कर्मसेनादि राजे, श्रुतधी व भीमपराक्रमादि मंत्री यांच्या साह्याने दिग्विजय संपादन केला आणि तो पृथ्वीपती झाला. नंतर तो रामराज्यासारख्या आपल्या राज्यात शशांकवती भार्येसह चिरकाल नाना सुखाचा आस्वाद घेत राहिला.

# चतुर ससा


कोण्या एका अरण्यात चंद्रसर नावाचे एक मोठे सरोवर होते. त्याचे पाणी स्वच्छ व निर्मळ होते. त्या सरोवराच्या काठी असंख्य सशाची कुळे राहात होती. शिलीमुख या नावाचा त्या सशांचा राजा होता. कडक उन्हाळ्यामुळे त्या अरण्यात इकडे तिकडे असलेल्या लहान मोठ्या सरोवरातील पाणी सुकू लागले. पण चंद्रसर सरोवर मात्र अथांग पाण्याने भरलेले होते.

त्याच अरण्यात पुष्कळ हत्ती राहात होते. त्यातील एका कळपाचा चतुरदंत या नावाचा पुढारी होता. त्याच्या कळपातील हत्तींना जवळपास प्यावयास पाणी न मिळाल्यामुळे एके दिवशी चतुरदंत आपल्या कळपातील हत्तींसह चंद्रसर सरोवराच्या काठी आला. त्या सरोवरातील अथांग पाणी पाहून सर्व हत्तींना फार आनंद झाला. लगबगीने सरोवरात शिरून ते पोटभर पाणी तर प्यालेच पण त्या पाण्यात त्यांनी मनसोक्त विहार केला.

हत्तींचा कळप सरोवराकडे येत आहे असे दिसताच पुष्कळ ससे जीवनरक्षणार्थ आपल्या बिळात जाऊन बसले.पण हत्तींच्या पायांनी त्यांची बिळे उध्वस्त झाली. आणि बरेच ससे त्यांच्या पायाखाली चिरडून मेले. काही वेळाने चतुरदंत आपल्या कळपास घेऊन तेथून निघून गेला. तेव्हा अत्यंत दुःखी व कष्टी झालेल्या शिलीमुख राजाने सर्व सशांना एके ठिकाणी बोलाविले. शिलीमुख राजाचा विजय या नावाचा एक ससा मंत्री होता. सर्व सशांसमोर राजा त्याला म्हणाला, ''त्या गजराजाला या सरोवराचा पत्ता लागला आहे.यापुढे तो नेहमीच आपल्या कळपासह इथे येईल. आणि हत्तींच्या धांगडधिंग्यामुळे आपणा सर्वांचा संहार होईल. आपण वंशपरंपरागत या सरोवराच्या काठी रहात आहोत. तेव्हा आपले पुरातन असे हे वसतीस्थान आपल्याला कसे सोडता येईल? विजय, तू मोठा शहाणा व चतुर आहेस. तेव्हा गजराज आपल्या कळपासह इथे येणार नाही अशा एखादा चांगल्या युक्तीची योजना कर. तुझ्याशिवाय हे कार्य दुसरा कोणीही करू शकणार नाही.''

असे आपल्या राजाचे बोलणे ऐकून विजय त्या कामगिरीवर निघाला. सर्व सशांसमक्ष राजाने आपले कौतुक केले म्हणून त्याला फार आनंद झाला होता. गजराजाच्या कळपाचा शोध करीत विजय त्या अरण्यातून चालू लागला. कोणत्या उपायाने गजराजाला त्या सरोवराकडे येण्यापासून परावृत्त करता येईल या संबंधीचा विचार करीत तो पुढे चालू लागला. काही अंतर चालून जाताच समोरून येत असलेला तो गजराज विजयला दिसला. तो चतुर ससा जवळच असलेल्या एका टेकडीच्या माथ्यावर चढला आणि तेथून तो चतुरदंताला म्हणाला, "गजराज, थोडं थांब. मी काय सांगतो ते लक्ष देऊन ऐक!"

"मी चंद्रदेवाचा दूत आहे. चंद्रदेवाची तुला अशी आज्ञा आहे की चंद्रसर सरोवर हे माझे राहण्याचे ठिकाण आहे. तेथे जे पुष्कळ ससे राहतात, ते माझे प्रजाजन असून मी त्यांचा राजा आहे. ते ससे माझे अतिशय आवडते आहेत. मी शीतांशु व शशी या नावाने जो प्रसिद्ध आहे तो त्यांच्यामुळेच. काल तू आपल्या कळपासह त्या सरोवरात शिरून त्याचे स्वच्छ पाणी गढूळ केलेस व माझ्या पुष्कळ



विभाग.
दिनांक 31/3/84
विषय

प्रिय सशांना ठार मारलेस हे मला कळले आहे. तुझ्या हातून पुन्हा जर असे कृत्य घडले तर त्याचा परिणाम तुला भोगावा लागेल!''

टेकडीच्या माथ्यावरून धिटाईने बोलत असलेल्या विजय सशाचे असे शब्द ऐकून चतुरदंताला तो ससा खरोखरच चंद्राचा दूत आहे असे निश्चित वाटले व तो भयग्रस्त झाला. तो नम्रपणे म्हणाला, ''हे चंद्रदूता, माझ्या हातून पुन्हा तसे दुष्कृत्य घडणार नाही. भगवान चंद्रदेवाची आज्ञा मला शिरसावंद्य आहे.'' असे गजराजाचे पश्चात्तापयुक्त बोलणे ऐकून विजय त्याला म्हणाला, ''गजराज, आता तू माझ्याबरोबर चल. चंद्रदेवाचं दर्शन घे आणि त्याची प्रार्थना कर!'' असे म्हणून त्या चतुर सशाने गजराजाला चंद्रसराच्या काठी नेले. व तिथे सरोवरीतील पाण्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब त्याने त्याला दाखविले.

तेव्हा खरोखरच ते सरोवर चंद्रदेवाचे निवासस्थान आहे अशी गजराजाची खात्री पटली. त्याने चंद्राच्या त्या प्रतिबिंबाला मोठ्या भक्तिभावाने नमस्कार केला आणि तो तेथून चालता झाला. गजराज पुन्हा कधीही त्या सरोवराकडे गेला नाही. विजयने मोठ्या चातुर्याने केलेले फार मोठे कार्य पाहून शिलीमुखाने सर्व सशांच्या समक्ष त्याचा गौरव केला. आणि तो सर्व सशांसमवेत त्याच सरोवराच्या काठी मोठ्या सुखासमाधानाने राहू लागला.

# स्वामिनिष्ठेचे फळ

कोणे एके काळी गंगासागराच्या काठी ताम्रलिप्ती या नावाची एक सुखसंपन्न नगरी होतो. त्या नगरीचा राजा चंडसेन मोठा शूर, धर्मशील व प्रजाहितदक्ष होता. एके दिवशी दक्षिण देशातील सत्वशील नावाचा एक राजपुत्र राजद्वारी आला. आणि राजाला भेटण्याची आपली इच्छा असल्याचे त्याने द्वारपालाला सांगितले. तेव्हा द्वारपालाने सत्वशीलाला राजाकडे नेले. तिथे गेल्यावर राजाला वंदन करून सत्वशीलाने आपली सर्व हकीकत राजाला सांगितली आणि अखेर तो म्हणाला, 'महाराज, तनमनानं आपली सेवा करावी याच हेतूनं मी आपणापाशी आलो आहे. तशी आपली आज्ञा असावी!' तशी राजाज्ञा मिळाल्यावर सत्वशील अहर्निश राजसेवा करू लागला. मुळीच धनवंत नसल्यामुळे इतर राजपुत्रांप्रमाणे मोठ्या डामडौलात राहणे त्याला शक्य नव्हते. धनाची त्याला मुळीच अपेक्षा नव्हती असे नाही. ते राजाकडूनच त्याला प्राप्त होणार होते. पण बरेच दिवस त्याची सेवा घेऊन सुद्धा राजाने काहीच द्रव्य दिले नाही.

आज ना उद्या राजा आपल्या सेवाभावाने आपल्यावर प्रसन्न होईल आणि द्रव्यचिंता नाहीशी होईल या दृढ विश्वासाने सत्वशील अंगिकारलेल्या कार्यात तत्पर राहिला होता. अशीच काही वर्षे गेली. एके दिवशी निराश झालेल्या सत्वशीलाच्या मनात विचार आला, 'राजवंशात जन्म घेऊनही मी द्रव्यहीन कसा ? याही परिस्थितीत परमेश्वरानं माझा स्वभाव महत्त्वाकांक्षी का घडविला ? आज इतके दिवस उपासमार सहन करीत मोठ्या कष्टानं सेवाव्रत धारण करणाऱ्या माझ्याकडं राजाचं थोडं देखील लक्ष कसं जात नाही ?'

अशा प्रकारच्या विचारांच्या तंद्रीत सत्त्वशील असतानाच राजा

चंडसेन मृगयेसाठी राजमंदिरातून बाहेर पडला. तेव्हा चटकन् भानावर आलेल्या सत्त्वशीलाने आपला आवडता दंडा हाती धारण केला आणि तो घोड्यावर बसलेल्या राजापुढे धावत सुटला. राजाच्या पाठीमागून घोडेस्वार व पायदळ वाटचाल करीत होते. मृगयेसाठी खास राखून ठेवलेल्या अरण्यात राजा शिरला. तिथे तो घोड्यावरून इकडे तिकडे दौडत नाना प्रकारच्या प्राण्यांची शिकार करू लागला. तेवढ्यात एक भले मोठे व मस्त रानडुक्कर राजासमोरून धावत गेले. तेव्हा राजाने तत्काळ घोडा त्याच्या मागे पिटाळला. पण डुक्कर अत्यंत वेगाने पुढे पुढे पळत जाऊन बाजूच्या झाडीत दिसेनासे झाले आणि त्याचा पाठलाग करणाऱ्या राजाला मात्र त्याने बरेच दूर आणून सोडले. राजाच्या बरोबरचे शिकारी खूप मागे राहिल्यामुळे आता त्याला कोणी मार्गदर्शक राहिला नव्हता.

तितक्यात स्वप्राणाची पर्वा न करता राजाच्या घोड्यामागून धावत येणारा क्षुधा तृषा पीडित असा सत्वशील तिथे आला. तेव्हा राजाला हायसे वाटून त्याने त्याला विचारले, 'वीरा, आता इथून परत कसं जायचं ? तुला मार्ग माहीत आहे का ?' असे राजाचे स्नेहार्द्र शब्द ऐकून सत्त्वशील म्हणाला, 'होय, महाराज, पण आता सर्वत्र प्रखर उन्ह पडलं आहे. तेव्हा इथं काही काळ विश्रांती घ्या. नंतर आपण नगराकडं परत जाऊ !' 'ठीक आहे. तू म्हणतोस तसंच करू.' राजा म्हणाला, 'पण मला तहान लागली आहे. जवळपास कुठं पाणी आहे का ते बघ !' 'बराय् बघतो.' असे म्हणून सत्वशील जवळच्या एका उंच झाडावर चढला आणि तेथून त्याने चौफेर पाहिले. तेव्हा काही अंतरावरच त्याला एक नदी दिसली.

तेव्हा सत्त्वशील झाडावरून खाली उतरला आणि त्याने राजाला त्या नदीकाठी नेले. तेथे गेल्यावर सत्त्वशीलाने घोड्याला कोवळे गवत खाऊ घालून पाणी पाजले. तोपर्यंत राजा स्नान करून स्वस्थचित्त बसला आहे असे पाहून सत्त्वशीलाने आपल्या अंगावरल्या वस्त्राच्या एका टोकाला बांधलेले काही आवळे पाण्याने स्वच्छ धुतले आणि ते ओंजळीत घेऊन त्याने ती ओंजळ

राजापुढे केली. तेव्हा राजाने आश्चर्याने विचारले, 'हे वीरा, तुला हे आवळे कुठं मिळाले ?' तेव्हा भरल्या कंठाने सत्वशील म्हणाला, 'महाराज, मी गेली दहा वर्षे या असल्या आवळ्यांवरच उदरनिर्वाह करीत जगलो आहे,आपली तनमनानं सेवा करीत मी आजपर्यंत निष्ठेनं या तपस्व्याच्या व्रताचं पालन केले आहे.'

असे सत्त्वशीलाचे शब्द ऐकून राजाचे हृदय द्रवले. तो म्हणाला, 'खरंच, तू नावाप्रमाणं सत्वशील आहेस !' त्याच वेळी त्याच्या मनात विचार आला, 'आपली एकनिष्ठेनं सेवा या वीराला आपण आजपर्यंत काहीही द्रव्य दिलं नाही. तो कोणत्या करणाऱ्या परिस्थितीत आपलं जीवन कंठतो याची सुद्धा चौकशी केली नाही.' या विचाराने राजाला खंत वाटली. तो स्वतःशी म्हणाला, 'आपल्या सेवकांपैकी कोण सुखात आहे, कोण दुःखात आहे हे ज्या राजाला कळत नाही तो खरोखरच धिक्काराला पात्र आहे !'

'महाराज, हे आवळे खा. पाणी प्या. म्हणजे आपणाला खूप बरं वाटेल.' असे सत्वशीलाचे आत्मीयतेचे व आग्रहाचे शब्द ऐकून राजा चंडसेनाने त्याच्या ओंजळीतले फक्त दोनच आवळे घेतले. ते खाऊन त्याने जलप्राशन केले. सत्वशीलानेही नेहमीप्रमाणे आवळ्यावर आपली क्षुधा भागवून नदीच्या निर्मळ पाण्याने आपली तृषा शमविली. नंतर त्याने खोगीर घालून राजाचा घोडा सज्ज केला. राजा घोड्यावर बसला आणि मार्ग दाखवीत पुढे चालू लागलेल्या सत्वशीलाच्या मागून तो आपल्या नगराकडे निघाला.

बराच वेळ वाटचाल झाल्यानंतर चालून दमलेल्या सत्वशीलाला राजाने घोड्यावर आपल्या पाठीमागे बसण्याचा खूप आग्रह केला. पण त्याने मोठ्या विनयाने राजाच्या म्हणण्याला नकार देऊन तो चालतच राहिला. पुढे राजाचा सर्वत्र शोध करीत फिरत असलेल्या राजसैन्याची व त्यांची गाठ पडली. मग राजा त्या सर्वांसह नगराकडे परतला. नंतर राजा चंडसेनाने राजसभेत सत्वशीलाच्या राजनिष्ठेची खूप प्रशंसा करून त्याला पुष्कळ द्रव्य देऊन त्याचा गौरव केला. त्याच्या निवासाचीही चांगली सोय केली. एवढे करून सुद्धा

आपल्या हातून स्वामिनिष्ठ सत्वशीलाच्या उपकाराची समाधानकारक परतफेड झाली नाही, असेच त्याला वाटत राहिले. पण सत्वशील मात्र राजाची आपणावर कृपादृष्टी झाली म्हणून स्वतःला धन्य समजत पूर्वीप्रमाणेच तो राजसेवेत दक्ष राहू लागला.

असेच दिवसामागून दिवस जात काही महिने निघून गेले. राजा चंडसेनाला स्वतःसाठी सिंहलद्वीपच्या राजकन्येला मागणी घालावयाची होती. हे जबाबदारीचे काम सत्वशीलावर सोपवावे असे राजाने ठरविले. त्याप्रमाणे त्याने सत्वशीलाला सांगितले. त्याच्या जलप्रवासाची तयारी करून दिली. जलप्रवास सुखाचा व निर्विघ्नपणे व्हावा म्हणून सत्वशीलाने आपल्या इष्टदेवतेची मनोभावे पूजाअर्चा व प्रार्थना केली. नंतर एका शुभ दिवशी तो राजाचा खलिता घेऊन नौकेत बसताच ती नौका सिंहलद्वीपाकडे झपाट्याने निघाली.

सत्वशीलाचा सिंहलद्वीपाकडे जाण्याचा निम्मा अधिक जलप्रवास कोणत्याही प्रकारचे संकट न येता सुखरूपपणे पार पडला. नंतर एके दिवशी एकाएकी समद्रातून एक मोठा सोन्याचा ध्वज वर येऊ लागला. तो उंच होत होत एवढा उंच झाला की त्याचे वरचे टोक आभाळातील ढगामधून वर गेले. तेव्हा नौकेतील सर्वजण आश्चर्याने थक्क होऊन त्या नवलपूर्ण ध्वजाकडे टकूमक् बघतच राहिले. त्याच वेळी आभाळात चहू दिशांनी झरझर येऊ लागलेल्या काळ्याकभिन्न मेघांनी गडगडाट सुरू झाला. आता मुसळधार वृष्टी होऊ लागली. जोरदार वाऱ्याच्या सांगाती समुद्रावर लाटांचे तांडवनृत्य सुरू झाले. तेव्हा प्रलयकाळच जवळ आला की काय असे नौकेतील सर्व लोकांना वाटून ते अत्यंत भयग्रस्त झाले. या प्राणसंकटातून आता सुटका होणे कठीण असे वाटून ते देवाचा धावा करू लागले.

जोराच्या वाऱ्याने व वृष्टीने ती नौका ध्वजापाशी नेली. त्याच क्षणी ज्याची उंची झरझर कमी होऊ लागली आहे असा तो सोन्याचा ध्वज समुद्रात बुडू लागला. तेव्हा नौकेत हलकल्लोळ उडाला. नौकेतील सर्वजण राजाच्या

नावाने ओरडू लागले. त्यांचे ते ओरडणे सत्वशीलाला सहन झाले नाही. त्याने आपले अंगावर घेण्याचे वस्त्र कमरेला बांधले आणि स्वप्राणाची पर्वा न करता हाती खड्ग घेऊन समुद्रात ज्या जागी ध्वज बुडत होता तिथे नौकेवरून धाडकन् पाण्यात उडी ठोकली. ध्वज व सत्वशील हे दोघेही समुद्रपाण्यात दिसेनासे झाल्यावर वाऱ्याने समुद्रात दूरवर नेलेली ती नौका लाटांच्या जोरदार प्रहारांनी अखेर फुटली आणि आपल्या सर्वस्वासह ती रसातळाला गेली.

तिकडे समुद्रात बुडालेला सत्वशील समुद्रात काही अंतर खोल जाताच विस्मयाने चौफेर बघतच राहिला. तो आश्चर्याने उद्गारला, 'ज्या खवळलेल्या समुद्रात मी उडी घेतली तो कुठाय! इथं तर मी एका कुठल्यातरी दिव्य नगराच्या सुंदर मार्गावर उभा आहे!' असे म्हणून सत्वशील त्या रस्त्याने पुढे जाऊ लागला. तेव्हा एका बाजूच्या रम्य उद्यानातील एक सुवर्णमंदिर त्याला दिसले. त्या मंदिराचा उंच सुवर्णकळस झगमगत होता. त्या मंदिराच्या समोरच अद्भुत असा एक उंच रत्नजडित ध्वजस्तंभ उभा होता. त्याच्याकडे बघत असता त्याच्या मनात विचार आला, 'समुद्रातून वर आलेला ध्वजस्तंभ तोच तर नसेल ना!'

अशा विचारांच्या तंद्रीतच सत्वशील मंदिराच्या महाद्वाराशी गेला. तेव्हा ते मंदिर कात्यायनी देवीचे आहे असे त्याला आढळले. त्याच वेळी त्याला वाटले की देवीचे दर्शन घेतल्यानंतर कादाचित आपण आतापर्यंत अनुभवलेल्या अद्भुत घटनांच्या रहस्यांचा उलगडा तेथेच होईल. सत्वशीलाने मंदिरात प्रवेश केला. त्याने देवीला साष्टांग नमन केले. नंतर तिच्यासमोरच सभामंडपात बसून तो तिची मनोभावे प्रार्थना करू लागला. तेवढ्यात सभामंडपाच्या एका बाजूस असलेले द्वार उघडून एक अत्यंत सुंदर दिव्य कन्या बाहेर आली. तिच्या सांगाती खूप स्त्रियांचा मेळावा होता. देवीच्या पूजेसाठी ती लावण्यवती गाभाऱ्यात शिरली. लावण्याने मोहित झालेला सत्वशील विस्मयाने तिच्याकडे एकटक बघतच राहिला.

देवीची पूजा करून काही वेळाने ती सुंदरी गाभाऱ्यातून बाहेर आली.

आणि आलेल्या मार्गानेच परत जाण्यास निघाली. तेव्हा सत्त्वशीलही जादूने भारल्याप्रमाणे उठून तिच्या मागून निघाला. काही अंतर चालून गेल्यावर ती सुंदरी आपल्या परिवारासह एका प्रासादात शिरली. आणि तिथे असलेल्या एका रत्नजडित मंचकावर बसली. तिच्या मागोमाग तिथे आलेल्या सत्त्वशीलास पाहून तिने आपल्या जवळच्या एका दासीकडे नजर टाकली. त्या नजरेचा अर्थ जाणूती ती दासी सत्त्वशीलाला म्हणाली, "हे महाभाग, तुम्ही इथं अतिथी म्हणून आला आहात. आमच्या स्वामिनीच्या आतिथ्याचा कृपा करून स्वीकार करा. स्नान भोजनादिकाची सिद्धता आहे. प्रथम स्नानाची व्यवस्था कुठं आहे ते मी तुम्हाला दाखविते. चला. माझ्या मागून या!" असे म्हणून त्या दासीने सत्त्वशीलाला जवळच्या उद्यानातील एक रम्य विहीर दाखविली आणि ती निघून गेली. सत्त्वशील त्या विहिरीकडे गेला. विहिरीचे पाणी अत्यंत स्वच्छ असल्याने तिचा तळ देखील दिसत होता. त्या पाण्यात एकच बुडी घेऊन सत्त्वशील वर येऊन पाहतो तो आपण आपल्या ताम्रलिप्ती नगरातील एका उद्यानातील विहिरीत आहोत असे त्याला आढळून आले.

तेव्हा मोठ्या विस्मयाने तो उद्‌गारला, 'हा काय अद्‌भुत चमत्कार आहे? मी होतो कुठं आणि एका क्षणात इथं आलो कसा? कुठाय ती पाताळातील दिव्य नगरी? कुठं गेली ती दिव्य लावण्यवती? ते एक सुंदर स्वप्न होतं असं म्हणावं तर टळटळीत जागेपणीच मी सर्व घटना अनुभवल्या होत्या. अरेरे, असं कसं झालं? त्या दिव्य सुंदरीला मी आता कधीच पाहू शकणार नाही.' असे म्हणून सत्वशील अत्यंत दुःखी कष्टी झाला आणि विहिरीबाहेर पडून तो वेड्यासारखा त्या उद्यानात भटकू लागला. तशा त्या अवस्थेत उद्यानरक्षकाने त्याला पाहिले. आणि तो परत आल्याची वार्ता राजा चंडसेनाला सांगितली. तेव्हा तो त्वरेने उद्यानात आला, तिथे देहभान हरपल्याप्रमाणे फिरत असलेल्या सत्वशीलाला पाहून त्याला वाईट वाटले. त्याने जवळ जाऊन सत्वशीलाला विचारले, 'मित्रा, सिंहलद्वीपाकडं जात असलेला तू इथं एकाएकी कसा आलास? असं कस झालं?'

असे राजाचे शब्द ऐकून भानावर आलेल्या सत्वशीलाने प्रवासात

घडलेली सर्व हकीकत राजाला सांगितली आणि अखेर तो म्हणाला, 'महाराज, त्या पाताळ सुंदरीनं मला फसवलं या गोष्टीचं मला फार दुःख होतंय्!' तेव्हा सत्वशीलाचं सांत्वन करीत असता राजाच्या मनात विचार आला, 'सत्वशीलानं माझ्यावर यापूर्वी केलेल्या उपकाराची परतफेड करण्याची संधी आता माझ्या सुदैवानंच आणून दिली आहे. तिचा उपयोग करून घेतला पाहिजे.' असा विचार करून तो सत्वशीलाला म्हणाला, 'मित्रा, तू मुळीच दुःख करू नकोस. ज्या पाताळ सुंदरीनं तुझं चित्त हरण केलं आहे, तिच्याकडं मी तुला घेऊन जातो. आता स्नान भोजनादिक कृत्ये तू स्वस्थ चित्तानं कर!' राजाच्या अशा बोलण्यानं समाधान पावलेला सत्वशील घराकडे निघून गेला.

नंतर दुसऱ्या दिवशी राज्यकारभाराची सर्व जबाबदारी आपल्या मंत्र्यावर सोपवून चंडसेन सत्वशीलासमवेत नौकेत बसला आणि त्याने सांगितलेल्या मार्गाने सिंहलद्वीपाकडे निघाला. त्यांची नौका समुद्राच्या मध्यभागी येताच पूर्वीप्रमाणेच सोन्याचा ध्वज समुद्रातून वर येऊ लागला. तेव्हा अधीर झालेला सत्वशील राजाचे लक्ष वेधण्याकरिता तिकडे हात करून म्हणाला, 'महाराज, तो पहा समुद्रातून वर येऊ लागलेला सुवर्णध्वज!' तेव्हा राजा त्या अद्‌भुत ध्वजाकडे आश्चर्याने पाहू लागला. तेवढ्यात त्याची नौका त्या ध्वजाजवळ गेली. तेव्हा त्या ध्वजाने सावकाशपणे समुद्रात बुडण्यास सुरुवात केली.

ते पाहून सत्वशील चटकन् राजाला म्हणाला, 'महाराज, मी आता या ध्वजापाठोपाठ समुद्रात बुडी घेतो. आपणही माझ्या मागोमाग बुडी मारून या!' असे म्हणून सत्वशीलाने समुद्रात उडी घेतली. दुसऱ्या क्षणी राजानेही त्याचे अनुकरण केले. दोघेही बुडून काही अंतर खोल जाताच त्यांनी ते दिव्य नगर पाहिले. नंतर विस्मित झालेल्या राजाला सत्वशीलाने कात्यायनी देवीच्या मंदिरात नेले. तेव्हा देवीला वंदन करून राजा सत्वशीलासह मंदिराच्या सभामंडपातच थांबला.

थोड्या वेळाने देवीच्या पूजेकरिता नेहमीप्रमाणे ती लावण्यवती

आपल्या सख्यांचा मेळावा घेऊन मंदिरात आली. तेव्हा सत्वशील हळूच राजाला म्हणाला, 'महाराज, हीच ती पाताळ सुंदरी!' तिच्याकडे पाहताच तिच्यावर सत्वशील मोहित झाला हे योग्यच आहे असे राजाला वाटले. त्या सुंदरीचे राजाकडे लक्ष जाताच ती स्वतःशी म्हणाली, 'हा शुभलक्षणी देखणा पुरुषश्रेष्ठ कोण असावा!' असे म्हणून ती पूजेसाठी देवीच्या गाभाऱ्यात गेली. तेव्हा राजा सत्वशीलासह उठून मंदिराबाहेरच्या उद्यानात गेला. थोड्या वेळाने देवीची पूजा करून व चांगला पती दे अशी प्रार्थना करून ती दानवकन्या गाभाऱ्यातून बाहेर आली. तिला सभामंडपात राजा दिसला नाही, तेव्हा ती आपल्या सखीला म्हणाली, 'सखे, मी या सभामंडपात ज्या शुभलक्षणी पुरुषोत्तमाला पाहिलं तो कुठं गेला ते पाहा. आणि कृपा करून आपला आतिथ्य सत्कार करण्याचं भाग्य आम्हाला लाभू द्या अशी त्याची प्रार्थना कर. कारण तो कुणीतरी वंदनीय महात्मा आहे यात शंकाच नाही.'

त्याप्रमाणे सखीने राजाचा शोध करताच तो उद्यानात असल्याचे तिला आढळले. तेव्हा त्याच्यापाशी जाऊन सखीने मोठ्या नम्रतेने आपल्या स्वामिनीचा निरोप राजाला सांगितला. तेव्हा राजा तिला म्हणाला, 'बाई, खरं सांगायचं म्हणजे तुमच्या या निरोपानेच आमचं योग्य असं आतिथ्य झालं आहे. यापेक्षा जास्त आतिथ्यसत्कार करून घ्यावा अशी आमची इच्छा नाही!' असे राजाचे बोलणे सखीने परत जाऊन आपल्या स्वामिनीस सांगितले.

ते ऐकून हा थोर अतिथी मोठा मानी, उदार व निरिच्छ आहे हे जाणून ती दानवकन्या स्वतःच राजाकडे गेली आणि आपले आतिथ्य स्वीकारण्याची तिने त्याला कळकळीची विनंती केली. तेव्हा सत्त्वशीलाकडे नजर टाकून राजा तिला म्हणाला, 'सुंदरी, हा माझा मित्र सत्वशील. समुद्रातून वर येणाऱ्या सुवर्णध्वजामागून पाण्यात बुडी घेतल्यास कात्यायनी देवीचं मंदिर दिसतं अशी वार्ता यानं मला सांगितली होती. त्याप्रमाणं मी इथं आलो. मंदिरात जाऊन देवीचं दर्शन घेतलं. मोठं समाधान वाटलं. मग तिथं तुलाही पाहिलं. आता आणखी आतिथ्य व्हावं अशी वांछा मनात कुठं राहणार?'

असे राजाचे शब्द ऐकून दानवकन्या नाउमेद झाली नाही. उलट ती आग्रहपूर्वक म्हणाली, 'आतिथ्य नको असेल तर ते राहू दे. आपण इथं आलाच आहात तर माझी त्रैलोक्यात अत्यंत अद्भुत अशी दुसरी नगरी पाहिल्याशिवाय जाऊ नका अशी माझी आपणास नम्र विनंती आहे. ती नगरी खरोखर विस्मित होऊन पाहण्यासारखीच आहे.' ते ऐकून राजा तिला म्हणाला, 'कल्याणी, जिथं ती अद्भुत स्नानाची विहीर आहे त्या विलक्षण नगरी संबंधीही या माझ्या मित्रानं मला सांगितलं आहे!'

राजाच्या या बोलण्यातील खोच दानवकन्येच्या लक्षात येताच ती आपले दोन्ही कर जोडून म्हणाली, 'महाराज, असं म्हणून मला लाजवू नका. दुसऱ्यांना फसवायचं माझ्या स्वभावात नाही. आपणासारख्या थोर महात्म्यांच्या दर्शनानं मी धन्य झाले आहे. कृपा करून माझी विनंती ऐका!' असे त्या शुभांगीचे आर्जवी शब्द ऐकून राजा म्हणाला, ''ठीक आहे. चल. येतो मी त्या नगरीत!'' तेव्हा आनंदित झालेल्या त्या शुभांगीने राजाला सभामंडपातील द्वाराने आपल्या दुसऱ्या नगरात नेले. राजाबरोबर सत्त्वशील होताच.

खरोखरच ते दिव्य नगर मोठे अद्भुत होते. ते सुवर्ण व रत्ने यांनी निर्माण केलेले होते. तेथील रम्य उद्यानातील झाडे फुलाफळांनी बहरलेली होती. एकाच वेळी सहाही ऋतूंचे ऐश्वर्य तिथे विलसत होते. अशा त्या मनोरम नगरातील एका भव्य प्रासादात त्या शुभांगीने राजाला नेले. नंतर त्याला एका रत्नासनावर बसवून त्याचा सत्कार केला आणि ती म्हणाली, 'महाराज, असुराधिपती कालनेमी यांची मी मुलगी. विष्णूनं माझ्या पित्याला मारलं. ही दोन नगरं विश्वकर्म्यानं माझ्या वडिलांना खास निर्माण करून दिली होती. सर्व मनोरथ परिपूर्ण करणाऱ्या या नगरात म्हातारपण व मृत्यू यांना प्रवेश नाही. महाराज, आता आपणच माझे वडील आहात. मी आपली कन्या आहे. आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे.'

असे त्या शुभांगीचे प्रेमळ शब्द ऐकून राजा चंडसेनाचे हृदय भरून आले. तो तिला म्हणाला, ''मुली, माझ्याबद्दल तुझी भावना जर तशी असेल

तर तू या सत्त्वशीलाचा अंगिकार कर. कारण तो प्रतापी असा माझा जिवलग मित्र आहे.'' तेव्हा गुणग्राही अशी ती शुभांगी नम्रतेने म्हणाली, ''आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे.'' नंतर एका मंगल मुहूर्तावर चंडसेनाने कन्यादान म्हणून केलेल्या त्या शुभांगीशी सत्त्वशीलाने विवाह केला. त्या समयी दोन्ही नगरांच्या अलोट वैभवाचा सत्त्वशीलला अधिपती करून चंडसेन त्याला म्हणाला, ''मित्रा, भुकेनं व्याकुळ झालो असताना खाण्यासाठी तुझ्याकडून घेतलेल्या दोन आवळ्यांपैकी एका आवळ्याच्या ऋणातून मी आज मुक्त झालो आहे. आता फक्त एकाच आवळ्याचा ऋणात मी आहे.''

असे अतिशय नम्र होऊन वंदन करणाऱ्या सत्त्वशीलाला सांगून राजा शुभांगीस म्हणाला, ''मुली, माझं इथं येण्याचं कार्य झालं, आता माझ्या नगराकडे परत जाण्याचा मार्ग मला दाखव !'' तेव्हा तिने अपराजित नावाचे एक अलौकिक खड्ग व जरा-मृत्यूनाशक एक मधुर फळ अशा दोन अमूल्य वस्तू राजाला सप्रेम भेट म्हणून दिल्या. नंतर सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन त्या दोन बहुमोल वस्तूंसह राजाने शुभांगीने दाखविलेल्या विहिरीत बुडी मारली आणि लगेच आपल्या उद्यानातील विहिरीतून बाहेर पडून तो राजवाड्याकडे गेला. त्याच्या सुखरूप आगमनानिमित्त सर्व नगरात मोठा आनंदोत्सव सुरू झाला.

❦ ❦

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९८३ दिनांक ३१३।०७
विभाग बा.वा. क्र. ........
BVBK-0402983